cmyk

## संपादकीय

### बिहारच्या निकालाने मतचोरी सिद्ध, शंकेला वाव आहे का?

बिहारच्या निवडणुकांनंतर झालेले मतचोरीचे आरोप हे फक्त राजकीय गप्पा किंवा चर्चेपुरते मर्यादित नाहीत; ही राज्य लोकशाहीसाठी मोठा इशारा आहे. मागील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत विरोधी पक्षांनी, सामाजिक संघटनांनी आणि माध्यमांनी सतत प्रश्न उपस्थित केला, पण न्यायालयाने अद्याप ठोस निष्कर्ष दिलेला नाही.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१९८ | शनिवार दि.१५ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### राज्यातील बालकांचा १६.३ टक्के न्यूमोनियामुळे मृत्यू

नागपूर : राज्यातील एकूण बाल मृत्युपैकी १६.३ टक्के मृत्यू हे न्यूमोनिया आजारामुळे होतात. याचे गांभीर्य लक्षात घेऊन आजारावर समाजामध्ये जागृती करणे, आजारापासून संरक्षण करणे, आजाराचा प्रतिबंध करणे याविषयी माहिती प्रचार–प्रसिद्धी करण्याचे उद्देशाने विशेष मोहीम राबवली जात आहे. तीव्र श्वसनदाह आजारामुळे होणारे बाल मृत्यू टाळण्यासाठी राज्यात सांस मोहीम सुरू झाली आहे. सांस मोहिमेद्वारे 'न्यूमोनिया यशस्वीपणे निष्फळ करण्यासाठी सामाजिक जागरूकता आणि कृती' मोहिमेचे नियोजन केले आहे. या मोहिमेत ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांचे घरोघरी जाऊन सर्वेक्षण करण्यात येणार आहे. आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी यांचे मार्फत प्रत्यक्ष घरोघरी भेटीद्वारे मुलांची तपासणी करण्यात येणार आहे.

### भाजपच्या अमित साटम यांची ठाकरे बंधूवर टीका

मुंबई : बिहारमधील विधानसभा विजयानंतर भाजप नेत्यांचा आत्मविश्वास दुणावला असून आता मिशन मुंबई म्हणत भाजपने महापालिका निवडणुकांची तयारी सुरू केली आहे. बिहार विधानसभा ट्रेलर, मुंबई महापालिका खरा पिच्चर, असे म्हणत मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी मुंबई महापालिका निवडणुकांसाठी भाजपचे रणशिंग फुंकले आहे. यावेळी, त्यांनी ठाकरे बंधू एकत्र येण्यावरुनही जोरदार टीका केली. मुंबईकरांच्या खिशावर डल्ला मारणारे, संपत्ती लुटणारे, मुंबईकरांवरती डाका टाकणारे हे डाकू आहेत, मुंबई महापालिकेवर २५ वर्षांपासून ज्यांनी राज्य केले, ते डाकू आहेत, असे म्हणत नाव न घेता साटम यांनी ठाकरेंवर हल्लाबोल केला.

### फास्टॅग नियमात बदल चूक झाल्यास दुप्पट पैसे

पुणेः जर तुमच्या वाहनावर वैध फास्टॅग नसेल किंवा तो तांत्रिकदृष्ट्या काम करणार नसेल, तर तुम्हाला टोल प्लाझावर दंड भरावा लागेल. यापुढे रोख रक्कम देणाऱ्यांना सामान्य टोलच्या दुप्पट पैसे द्यावे लागतील, ज्यामुळे तुमचा खिसा रिकामा होईल. मात्र, डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यासाठी युपीआय द्वारे पेमेंट केल्यास फक्त २५% जास्त भरावे लागतील. हा नियम फास्टॅग फेल झाल्यास किंवा नसल्यास लागू होईल आणि टोल प्लाझावरील गर्दी कमी करून प्रवास सोपा करण्याचा हेतू आहे. १५ नोव्हेंबर २०२५ पासून राष्ट्रीय महामार्गांवरील टोल प्लाझावर टोल पेमेंटचे नियम पूर्णपणे बदलणार आहेत.

### तरी आईची जबाबदारी मुलावरच – हायकोर्ट

तिरुवनंतपुरमः पती जिवंत असेल आणि पत्नीचा सांभाळ करत असला तरीही आई तिच्या मुलाकडून पोटगी (पालनपोषण खर्च) मागू शकते, असा महत्त्वपूर्ण निर्णय केरळ उच्च न्यायालयाने नुकताच दिला आहे. तसेच ६० वर्षीय आईला दरमहा ५,००० रुपये पोटगी देण्याच्या कुटुंब न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणारी याचिका न्यायालयाने निकाली काढली. आईने कलम १२५ सीआरपीसी अंतर्गत आखाती देशात परदेशात काम करणाऱ्या मुलाकडे प्रति महिना २५,००० रुपये पालनपोषण खर्चाची मागणी केली होती. पुराव्यांचा विचार केल्यानंतर, कुटुंब न्यायालयाने प्रति महिना ५००० रुपये मंजूर केले.

### धर्मेंद्रचा व्हिडियो व्हायरल करणाऱ्या स्टाफला अटक

मुंबईः अभिनेते धर्मेंद्र यांची तब्येत गेले काही दिवस बरी नाही. काही दिवस हॉस्पिटलमध्ये ठेवल्यानंतर अलीकडेच त्यांना हॉस्पिटलमधून घरी नेण्यात आले. गेल्या १० डिसेंबरला धर्मेंद्र यांना ब्रीच कँडी हॉस्पिटलमध्ये दाखल केले होते. त्यानंतर त्यांची तब्येत जास्त खालावली. यादरम्यान त्यांच्या मृत्यूची अफवा समोर येऊ लागली. यावेळी घरच्यांनी आक्षेप घेऊन त्यांच्या प्रकृतीबाबत अपडेट दिली. पण या सगळ्यादरम्यान एक धक्कादायक बाब समोर येत आहे. मुंबई पोलिसांनी काही दिवसांपूर्वी धर्मेंद्र ॲडमिट असेलया ब्रीच कँडी हॉस्पिटलमधील एका कर्मचाऱ्याला अटक केली आहे. त्याच्यावर आरोप आहे की, त्याने धर्मेंद्र यांच्यासोबत देओल कुटुंबियांचे वैयक्तिक क्षणांचा व्हिडियो चोरून रेकॉर्ड केला होता.

# राज्य सरकारला साखरेची काळजी अन्य पिकं वाऱ्यावर

## साखरेच्या दरवाढीसाठी केंद्राकडे गळ; इतर पिकांचे दर मात्र एमएसपीच्या खाली

पुणे । प्रतिनिधी

**साखरेचे किमान विक्री मूल्य ३१ रुपये प्रतिकिलोवरून ४१ रुपये प्रतिकिलो करावे, अशी विनंती राज्य सरकारने केंद्रीय ग्राहक कल्याण व अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाकडे केली आहे. दुसरीकडे, कापूस, सोयाबीनसह बहुतांश खरीप शेतमालाचे दर एमएसपीपेक्षा कमी असून, सरकार त्या शेतमालाची एमएसपी दराने खरेदी करण्यास दिरंगाई करीत असल्याचे दिसत आहे.**



राज्य सरकार साखरेबाबत जी तत्परता दाखवित आहे, ती इतर शेतमालाबाबत का दाखवित नाही, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सन २०१८–१९ मध्ये उसाची एफआरपी २,७५० रुपये प्रतिटन होती, ती २०२५–२६च्या हंगामासाठी ३,५५० रुपये प्रतिटन केली आहे. त्यामुळे साखरेचे किमान विक्री मूल्य ३१ रुपये प्रतिकिलोवरून ४१ रुपये प्रतिकिलो करण्याची मागणी राज्य सरकारने केंद्राकडे केली आहे. कारखानदारांना प्रतिकिलो साखर ३१ रुपयांपेक्षा अधिक दराने विकण्याची परवानगी असून, आज खुल्या बाजारात साखरेचे दर प्रतिकिलो ४८ रुपये आहेत. सध्या कापूस, सोयाबीन, तूर, मका यासह बहुतांश तेलबिया व डाळवर्गीय पिकांचे दर एमएसपीपेक्षा खाली आले आहेत. सरकारने या शेतमालाची एमएसपी दराने खरेदी करण्याची घोषणा केली असली तरी ऑनलाइन नोंदणीतील जाचक अटींमुळे शेतकऱ्यांची अडवणूक केली जात आहे. वारंवार मागणी करूनही सरकार शेतमाल खरेदी केंद्र ▶▶ पान २ वर

# भाजपचा बिहारमध्ये ऐतिहासिक विजय!

## नव्वदच्या पुढे जागा घेत ठरला मोठा भाऊः सुत्र नितीशकुमार कडे

पाटणा । वृत्तसंस्था

बिहार विधानसभा निवडणुकांच्या निकालात भाजप एनडीएने मोठा विजय मिळवला असून, भाजपच मोठा भाऊ ठरला आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत एनडीएमध्ये भाजप, जयदू, एलजेपी, एचएएम आणि आरएलएम या ५ पक्षांची एनडीए आघाडी होती. एनडीएमधील सर्वच पक्षांना गत २०२० च्या विधानसभा निवडणुकांच्या तुलनेत यंदा चांगले यश मिळाल्याचे दिसून येत आहे. राज्यातील २४३ जागांपैकी यंदा भाजप आणि जदयूने १०२ जागांवर उमेदवार मैदानात उतरवले होते. तर, चिराग पासवान यांच्या लोकजनशक्तीने २९ उमेदवारांना



तिकीट दिले. तसेच, हिंदुस्तानी आवाम मोर्चाने ६ आणि आरएलएमने ४ उमेदवारांना उमेदवारी दिली होती. त्यामध्ये, एनडीए आघाडीला २०० पेक्षा जास्त जागांवर विजय मिळत असल्याचे दिसते. त्यामध्ये, भाजप ९१ तर नितीशकुमार यांच्या जदयूला ७९ जागांवर आघाडी असल्याचे दिसून येते.

बिहार विधानसभेच्या निवडणुकीत दोन टप्प्यांत झालेल्या मतदानानंतर शुक्रवारी दि.१४ रोजी मतमोजणी झाली. २४३ जागांपैकी बहुमतासाठी १२२ चा आकडा कोण गाठणार याची देशभरात उत्सुकता होती. नितीशकुमार आणि भाजप यांची एनडीए विरुद्ध राजद व काँग्रेसची महाआघाडी यांच्यात हे सत्तेचे रणांगण प्रामुख्याने रंगले होते. मतदानानंतर सत्ताधारी एनडीएला बिहारी जनतेने पुन्हा संधी दिली असल्याचे दिसून आले आहे. यात भाजपाचा ऐतिहासिक ▶▶ पान २ वर

# तर विनोद तावडे होऊ शकतात भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष?

नवी दिल्ली । वृतसंस्था

बिहारमध्ये भाजपचे निवडणूक प्रभारी म्हणून जबाबदारी सांभाळणारे विनोद तावडे यांचीही बरीच चर्चा होत आहे. राजकीय तज्ज्ञांच्या मते, बिहारमध्ये एनडीएला इतकी मोठी आघाडी मिळवून देण्यात विनोद तावडे यांच्या बुद्धीचा कस लागला आहे. तावडे यांनी प्रत्येक जागेवरील उमेदवारांची निवड अत्यंत विचारपूर्वक केली. गायिका मैथिली ठाकूर यांनाही निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्याची चाल याच रणनीतिकाराची होती. बिहारमधील शपथविधीनंतर विनोद तावडे हे भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष बनतील असा



अंदाज व्यक्त केला जात आहे.

बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा झंझावात विरोधकांना रोखता आलेला नाही. एनडीएने बहुमताचा जादुई आकडा सहजपणे ओलांडून विजय पताका फडकावली आहे. दुसरीकडे, महागठबंधन मात्र बहुमतापासून खूप दूर फेकले गेले आहे. विशेष नोंद घेण्यासारखी गोष्ट म्हणजे, काँग्रेससारखा ▶▶ पान २ वर

# राज्यात साथीच्या आजारांचा उद्रेक

## मुंबईसह इतर जिल्ह्यांतही रूग्णांची संख्या वाढली

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात अनियमित पाऊस, साचलेले पाणी आणि बदलते हवामान या कारणांमुळे डासांची उत्पत्ती वाढली असून, मलेरिया, डेंग्यूचा, चिकनगुनियाचा प्रादुर्भाव वाढत आहे. राज्यात मुंबई मलेरिया, डेंग्यू आणि चिकनगुनियाची हॉटस्पॉट ठरली आहे.

यंदा मे महिन्यातच पावसाला सुरुवात झाली होती. हा पाऊस नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत सुरूच होता. या कालावधीत हवामानात सातत्याने बदल होत असल्याने साथीच्या आजारांनी डोके वर काढले. राज्यात मान्सून परतला असला तरी सध्या साथीच्या आजारांचा प्रकोप सुरूच आहे. आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांत डेंग्यू, मलेरिया, स्वाईन फ्लू, लेप्टोस्पायरोसिस, चिकनगुनिया आणि जलजन्य आजारांचे ३९,७१८ रुग्ण नोंदले गेले असून ३८ जणांचा मृत्यू झाला आहे.

मलेरिया व डेंग्यू या डासजन्य रोगांनी ग्रामीण तसेच शहरी भागांमध्ये गंभीर परिस्थिती निर्माण केली आहे. आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, ७ नोव्हेंबरपर्यंत राज्यात मलेरियाचे २०,१६६ रुग्ण आणि १५ मृत्यू, तर डेंग्यूचे १२,३५१ रुग्ण नोंदवले गेले आहेत. याशिवाय, जलजन्य आजारांमध्ये ▶▶ पान २ वर

# पालिका निवडणुकीत ना युती ना आघाडी सामान्य कार्यकर्त्यांसाठी प्रस्थापित दूर दूर

बीड– पुणे । प्रतिनिधी

राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतीमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी आता हळूहळू रंग येत आहे. नगराध्यक्ष आणि सदस्यांसाठी निघालेले आरक्षण पाहता या आरक्षणात प्रस्थापितांना मोठा धक्का पोहोचला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सर्वसामान्य कार्यकर्त्यांसाठी




असतात असे नेते बोलतात मात्र आता प्रत्यक्षात प्रस्थापित पुढारी मात्र पुढे येताना दिसत नाहीत. बीड जिल्ह्यासह राज्यातील अनेक ठिकाणी ना युती ना आघाडी अशीच बोंबाबोंब झाली आहे. त्यामुळे प्रस्थापित नेते मात्र थांबा ऐनवेळी बघू, असे बोलताना दिसतात.

▶▶ पान २ वर

# एक कोटींहून अधिक लाडक्या बहिणींची ई–केवायसी पुर्ण

### अंतिम मुदत १८ नोव्हेंबर, पुन्हा मुदतवाढ मिळण्याची शक्यता

मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील ई–केवायसी प्रक्रियेला लाभार्थी महिलांकडून प्रतिसाद मिळत आहे. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार आतापर्यंत १ कोटीपेक्षा अधिक महिलांनी त्यांची ई–केवायसी प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली आहे. ई–केवायसीची अंतिम मुदत १८ नोव्हेंबर जवळ आलेली असताना, सरकारने या मुदतीत वाढ करण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.

आदिती तटकरे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले ▶▶ पान २ वर

# मुलासाठी अजित पवार सरकारमधून बाहेर पडणार होते

## अंबादास दानवे यांच्या वक्तव्याने खळबळ

मुंबई । प्रतिनिधी

पुण्यातील जमीन खरेदीप्रकरणी अडचणीत आलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सरकारमधून बाहेर पडून सरकारला बाहेरून पाठिंबा देण्याची तयारी दर्शवली होती, असा खळबळजनक दावा



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार तथा विधान परिषदेतील माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. अजित पवार यांच्या या टोकाच्या भूमिकेमुळेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ▶▶ पान २ वर




# मनोज जरांगेंच्या हत्येचा कट

## आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी

अंबड । प्रतिनिधी

जरांगे पाटील यांच्या घातपाताचा कट रचल्याच्या प्रकरणातील आरोपींची पोलीस कोठडीतून न्यायालयीनं कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. अणोल खुणे, दादा गरुड आणि कांचन साळवीला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.

जालन्यातील अंबड प्रथमवर्ग न्याय दंडाधिकाऱ्यांच्या कोर्टात पोलिसांनी जरांगे पाटील यांच्या घातपाताचा कट



रचल्याच्या प्रकरणातील आरोपींना हजर केले होते. यावेळी न्यायालयाने त्यांना पोलिस कोठडीतून न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. दरम्यान, याप्रकरणी पोलिसांनी दादा गरड आणि अमोल खुणे यांना अटक केली होती. त्यानंतर ११ नोव्हेंबरला रात्री उशीरा ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१४ नोव्हेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः ४७.०० क्विंटल | २,२०० | ३,०६१ | २,६४३ |
| ज्वारी/हायब्रिड :७४.५० क्विंटल | २,१०० | ४,३५१ | २,९३६ |
| मका/लोकलः ५०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर : ८.५० क्विंटल | ६,५६१ | ६,५६१ | ६,५६१ |
| उडीद : ३.०० क्विंटल | ४,६०० | ४,६०० | ४,६०० |
| बाजरीः ७९.०० क्विंटल | २,४३१ | ४,१५० | २,९४२ |
| मुगः ०.५० क्विंटल | ५,३०१ | ५,३०१ | ५,३०१ |
| सोयाबीनः२१५.०० क्विंटल | ४,२५० | ४,७५० | ४,५९४ |
| हरभराः १.०० क्विंटल | ५,५०० | ६,९०० | ६,२०० |

cmyk

अग्रलेख

# बिहारच्या निकालाने मतचोरी सिद्ध, शंकेला वाव आहे का?

बिहारच्या निवडणुकांनंतर झालेले मतचोरीचे आरोप हे फक्त राजकीय गप्पा किंवा चर्चेपुरते मर्यादित नाहीत; ही राज्य लोकशाहीसाठी मोठा इशारा आहे. मागील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत विरोधी पक्षांनी, सामाजिक संघटनांनी आणि माध्यमांनी सतत प्रश्न उपस्थित केला, पण न्यायालयाने अद्याप ठोस निष्कर्ष दिलेला नाही. ही शंका फक्त मतदारांची नाही; ती प्रशासन आणि न्यायव्यवस्थेच्या पारदर्शकतेवर खोलवर उठलेला प्रश्न आहे.

लोकशाही म्हणजे फक्त बटन दाबणे नाही; तो प्रत्येक नागरिकाचा हक्क आणि जबाबदारी आहे. बिहारच्या मतदारांनी उत्साहाने मतदान केले, पण जर त्यांचा निर्णय योग्यरित्या मोजला गेला नाही, तर हा अपमान निवडणूक यंत्रणेचा नाही, तर संपूर्ण लोकशाहीचा प्रश्न बनतो. राजकीय आरोप, सामाजिक संघटनांच्या तक्रारी किंवा न्यायालयीन प्रलंबित याचिका सगळ्यात महत्वाचे म्हणजे मतचोरी सिद्ध करण्याचा निर्णय अद्याप न्यायालयाच्या हातात आहे. पण न्यायावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांच्या मनात शंका निर्माण झाली आहे. ''न्यायालय सत्ताधारींच्या ताब्यात आहे'' असे आरोप जर पसरत असतील, तर हा केवळ राजकीय विधानाचा विषय नाही; ही लोकशाहीच्या आत्म्याला लागणारी आग आहे. मतमोजणी प्रक्रिया, ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट यंत्रणा या सर्वांमध्ये पारदर्शकता आणि जबाबदारी असणे आवश्यक आहे. जेव्हा ही प्रक्रिया अपूर्ण किंवा संशयास्पद ठरते, तेव्हा लोकांचा विश्वास कोसळतो आणि लोकशाहीचा पाया हलतो. सत्ताधाऱ्यांनी हा गंभीर प्रश्न गांभीर्याने घेतला नाही, तर राज्याचे राजकीय स्थैर्य आणि लोकांचा नैतिक विश्वास दोन्ही धोक्यात येतात. मतदारांनी आपले हक्क ठामपणे बजावले आहेत. आता राज्य आणि आयोगाची जबाबदारी आहे की हा हक्क सुरक्षित करावा. बिहार फक्त एका राज्याची निवडणूक नाही; ही लोकशाहीच्या नैतिक आणि प्रशासकीय कसोटीची रणभूमी आहे. मताला आदर नाही, तर लोकशाहीचा ढग ढकलला जातो. न्यायालयीन निर्णय येईपर्यंत शंका दूर होत नाहीत; पण लोकांचा विश्वास टिकवण्यासाठी पारदर्शकता, जबाबदारी, धैर्य आणि कठोर प्रशासन आवश्यक आहे. इतिहास दाखवतो की बहुमत मिळालेल्या सरकारनेही विरोधकांचा सन्मान राखला पाहिजे. माजी पंतप्रधान राजीव गांधींना प्रचंड बहुमत मिळाले, तरी त्यांनी विरोधकांचा आवाज दाबला नाही. पण मागील १२ वर्षांपासून विरोधी पक्षाचा प्रभाव केंद्रात मर्यादित केला जात आहे. बिहारच्या निवडणुकीत याचे प्रत्यक्ष पुरावे दिसले. विरोधकांना दबावाखाली आणणे, ईडी, सीबीआयचा वापर करून राजकीय नियंत्रणे, मोर्चे-आंदोलनांवर निर्बंध या सर्वामुळे लोकशाहीची नैतिक प्रतिष्ठा धोक्यात येते. बिहारची लोकशाही आता फक्त निर्णयाची वाट पाहत नाही; ती जगण्याची लढाई लढत आहे. मतदारांनी आपले मतदानाचे हक्क पाळले; आता राज्याला आणि न्यायव्यवस्थेला त्याचे रक्षण करणे गरजेचे आहे. जर लोकशाहीचा आत्मा टिकवायचा असेल, तर सत्ताधारकांनी निष्पक्षता, पारदर्शकता आणि न्यायाची प्रामाणिकता दाखवावीच लागेल. अन्यथा, बिहार फक्त एका निवडणुकीतून नव्हे, तर संपूर्ण राज्य लोकशाहीच्या भवितव्यावर संकट निर्माण करून देईल. एव्हढे मात्र नक्की !

# राष्ट्रवादीचे डॉ.योगेश क्षीरसागर करणार वेगळी आघाडी

बीड । प्रतिनिधी

होऊ घातलेल्या नगरपालिका निवडणुकीमध्ये बीड शहरात राष्ट्रवादीमध्ये उघड उघड दोन गट पडल्याने गेल्या अनेक वर्षापासून नगरपालिकेवर क्षीरसागर कुटुंबांचा पकडा आहे परंतु आता अजित दादाच्या राष्ट्रवादीतच दोन गट पडल्यामुळे डॉक्टर भारत भूषण क्षीरसागर यांचे चिरंजीव आणि राष्ट्रवादीचे विधानसभा अध्यक्ष पालिका निवडणुकीत वेगळी आघाडी निर्माण करणार असल्याचे समजते.

बीड नगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या ताब्यात होती गेल्या अनेक वर्षापासून क्षीरसागर कुटुंबीयांची सत्ता पालखीवर होती राज्यात महायुतीचे सरकार आहे महायुती मधील भाजप शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांची युती पालिका निवडणुकीमध्ये होण्याची




शक्यता कमी आहे त्यातच राष्ट्रवादी अजित पवार गटाचे माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी बीड नगरपालिकेत हस्तक्षेप करत जुळवा जुळव केली आहे बहुतांशी नगरसेवक हे त्यांच्या गटात गेले आहेत आणि त्यांनी अध्यक्षपदावर दावा केला असल्याचे समजते यावरूनच आता योगेश क्षीरसागर डॉक्टर सारिका क्षीरसागर हे नाराज असल्याने ते पंडित गटासोबत जाणार नसल्याचे समजते त्यामुळे भाजप आणि शिवसेना शिंदे गटाला सोबत घेत स्वतंत्र आघाडी तयार करण्याच्या हालचाली सुरू आहेत दोन दिवसापूर्वीच योगेश क्षीरसागर हे परळी येथे जाऊन मंत्री पंकजा मुंडे यांची भेट घेतली आणि चर्चा केली तर दुसरे माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे हे क्षीरसागर यांच्या पाठीशी खंबीर आहेत त्यातच शिवसेना शिंदे गटाची साथ मिळाली तर सर्वांची मिळून वेगळी आघाडी तयार करण्याच्या हालचाली सुरू आहेत अशी आघाडी निर्माण झाली तर राष्ट्रवादी अजित पवार गट एकाकी पडेल असाही अंदाज वर्तवला जात आहे बीड नगरपालिकेचे अध्यक्ष पद अनुसूचित जातीसाठी राखीव आहे याच समाजाला प्रतिनिधित्व मिळावे अशी शहरातील नागरिकांची आणि आंबेडकर प्रेमींची इच्छा आहे मात्र तांत्रिक बाबी बघत अन्य उमेदवार देण्याच्या हालचाली देखील राष्ट्रवादीच्या एका गटाकडून सुरू असल्याने आता योगेश क्षीरसागर काय भूमिका घेतात आणि त्यांचे काका माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे काय निर्णय घेतात यावर बीडचे चित्र अवलंबून आहे.

### जयदत्त क्षीरसागर यांच्या निर्णयाकडे लक्ष

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी अद्याप कोणत्याही पक्षात प्रवेश केलेला नाही किंवा कोणत्याच पक्षाला पाठिंबा दिलेला नाही मध्यंतरी ते अजित पवार गटामध्ये सामील होणार अशी चर्चा होती मात्र त्यांनी अद्याप पर्यंत कसलाही निर्णय घेतलेला नाही आगामी नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये ते काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे ते पुतण्या योगेशला साथ देतात की अन्य मार्ग निवडतात हे पाहणे गरजेचे आहे.

# स्व.माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस बालदिन साजरा

**बीड । प्रतिनिधी**

वसंतराव नाईक विद्यालय पाटोदा शाळेच्या भव्य प्रांगणावर १४ नोव्हेंबर स्वर्गीय माजी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस बालदिन म्हणून विद्यालयात साजरा करण्यात आला त्याचबरोबर विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक प्राचार्य श्री तुकाराम तुपे सर होते प्रमुख पाहुणे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा पाटोदा चे शाखाधिकारी श्री मुळे साहेब व श्री वाधवा साहेब, डॉक्टर रवींद्र गोरे साहेब ,पत्रकार श्री विजय जोशी, पत्रकार श्री विजय जाधव, पत्रकार श्री जावेदभाई, पत्रकार श्री हमीदभाई, ग्रामविकास फाउंडेशनचे सचिव श्री राजू नागरगोजे, नवनिर्माण प्राथमिक शाळा पाटोदा शाळेचे मुख्याध्यापक श्री पठाण सर, श्री साजिद भाई. सर्व उपस्थित मान्यवरांचा विद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. वसंतराव नाईक विद्यालय पाटोदा ही शाळा शाळेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे या उपक्रमात इंग्रजी विषयाची भीती नाहीशी व्हावी म्हणून शाळेत इंग्रजी विषयाचे शब्द लेखन व पाठांतर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अमर महबूब पठाण वर्ग ८ १३५००० शब्द, खाडे सिद्धार्थ गणेश ३२००० शब्द, विठ्ठल बालाजी कदम २६००० शब्द, सत्यम दादासाहेब बांगर



२६००० शब्द, सार्थक मुंजा पांचाळ २२ २८५ शब्द, कुमारी ऐश्वर्या प्रदीप जाधव १८५११ शब्द, कुमारी प्रेरणा भागवत शिंदे १८०५५ शब्द, कुमारी प्रतीक्षा सूर्यभान सानप २१००० शब्द, सार्थक योगेश कदम १५००० शब्द, ओंकार गणेश भालेराव१६००० शब्द, कुमारी कार्तिकी कृष्णा नागरगोजे १७००० शब्द , प्रतीक परमेश्वर सोनवणे १६६६० शब्द, बांगर प्रेम मोहन १४ ००० शब्द, सार्थक सत्यम तांबे १३७६२ शब्द, कुमारी प्रीतम संभाजी मस्कर १२६३८ शब्द, तांबे प्रणित दत्तू १२२०० शब्द ,रोशन दादासाहेब तागड ११००० शब्द, सोमीनाथ श्रीराम माने १०८००शब्द, प्रीतम दादासाहेब बांगर १०४१२ शब्द, निंबाळकर वैभव बाळू १०००० शब्द, कुमारी अनुराधा महादेव नागरगोजे ९७७९ शब्द, कुमारी सोनिया जयराम जाधव ९००० शब्द, कुमारी ईश्वरी ज्ञानेश्वर चाफकानडे ८०५८ शब्द, सोफियान इमरान शेख ८७८५ शब्द, कुमारी प्राजक्ता कृष्णा नागरगोजे १२६०० शब्द, कुमारी श्रुती परमेश्वर सोनवणे ८४४५ शब्द, श्रेयश गणेश बांगर ६१२० शब्द , वरील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना ग्रामविकास फाउंडेशन येवलवाडी या फाउंडेशनच्या वतीने ट्रॉफी व प्रमाणपत्राचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागरगोजे एम आर सर यांनी केले आभार प्रदर्शन पर्यवेक्षक श्री राख सर यांनी केले. सर्व विद्यार्थ्यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा पाटोदा च्या वतीने बाल दिनानिमित्त मिठाईचे वाटप करण्यात आले.

# जय जवान माध्यमिक विद्यालयात पक्षी सप्ताह साजरा

**वडवणी । प्रतिनिधी**

दि.०५ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव बु तालुका वडवणी जिल्हा बीड येथील विद्यालयात पक्षी सप्ताह आयोजित करत सर्व विद्यार्थ्यांना पर्यावरण दृष्टीने विविध उपक्रम राबविण्यात येत असून त्या पैकी आपल्या सभोवताली अनेक प्रकारचे पक्षी आढळून येतात परंतु अनेक प्रकारचे पक्ष्यांची संख्या आज कुठेतरी कमी होत गेली असून त्या मुळे आपल्या सजीवसृष्टी मधील कमी होत चाललेली पक्षी जपणे आणि त्यांना संवर्धन करणे आवश्यक आहे. जय जवान माध्यमिक विद्यालयात हा उपक्रम राबविण्यात आला व त्यातून मोलाचा पक्ष्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि त्यांचे संवर्धन करणे असा संदेश देण्यात आला. सदरील कार्यक्रमाची सुरुवात ही महान वन्य अभ्यासक अरण्यारुषी मा.श्री.मारुती चितमपल्ली व थोर पक्षीशास्त्रज्ञ पक्षीप्रेमी डॉ. सलीम अली यांच्या प्रतिमेस विनम्र अभिवादन करण्यात आले.





सदरील कार्यक्रमाचे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शिंदे सर यांनी आपल्या भाषणातून विविध प्रकारच्या पक्षाबद्दल माहिती दिली.तसेच विद्यालयाचे प्राचार्य श्री. सारोक्ते डी जी सर यांनी या वेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले की पक्षी सप्ताह साजरा करण्या मागचा हेतू काय आहे पर्यावरणातील अनेक पक्षी व त्यांच्या प्रजाती त्यांच्या संख्यात होणारी घट व त्यामुळे जैव विविधते वर होणारा परिणाम त्याची जतन व संवर्धन करणे काळाची गरज आहे. विविध प्रकारचे पक्षाबाबत माहिती उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना दिली.सदरील कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कवडगाव येथील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व सर्व विद्यार्थी उपस्थित होते.तसेच जय जवान माध्यमिक शाळेतील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. या वेळी सदरील पक्षी प्रदर्शनात सहभागी असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी पक्षाबद्दल सर्व माहिती विद्यार्थ्यांना दिली. सर्व विद्यार्थ्यांनी विविध पक्ष्यांबद्दल माहिती जाणून घेतली.आणि एक प्रण करण्यात आला की आपण पक्षी जतन व संवर्धन करूया.सदरील कार्यक्रमासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथील मुख्याध्यापक श्री.अजीम पठाण सर,शिक्षक शिंदे सर, धायतीडक सर,कोरडे सर,तसेच जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद उपस्थित होते.तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते.या कार्यक्रमाची मोलाचे कार्य करणारे व कार्यक्रम रूपरेषा सांस्कृतिक विभाग प्रमुख चोपडे सर ,प्रास्ताविक टाले सर यांनी केले व कार्यक्रमाचे महत्त्व विशद केले. या कार्यक्रमात वर्ग नववी मधील सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी विशेष परिश्रम घेतले तसेच घाडगे सर यांनी सदरील कार्यक्रमाचे समारोप करत उपस्थित सर्वांचे आभार व्यक्त केले व कार्यक्रमाची सांगता झाली.

# सांगवी (पा.) येथे श्री भैरवनाथ जन्माष्टमी सोहळा उत्साहात संपन्न

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे पंचक्रोशीतील भाविकांच्या उपस्थिती मध्ये श्री भैरवनाथ जन्माष्टमी सोहळा १२ ते १३ नोव्हेंबर २०२५ या दोन दिवशी उत्साहात साजरा झाला. भक्तिमय वातावरण, धार्मिक कार्यक्रमांची चुरस, भजनी मंडळांचा सहभाग आणि महाप्रसादाच्या महिमा यामुळे संपूर्ण परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे.

पहिल्या दिवशी बुधवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ ते ८ वाजता क्षेत्र काशी, पैठण, नागतळा येथून आलेल्या कावडींची सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर कावड निवड कार्यक्रम पार पडला. रात्री ९ ते १० दरम्यान विनोदाचार्य ह.भ.प. भाऊसाहेब महाराज पन्हाळकर यांनी भाविकांना कीर्तनातून अध्यात्म आणि भक्तीची प्रेरणा दिली. रात्री ११ ते पहाटे ५ वाजेपर्यंत काशीनाथ जाधव व सहकारी यांनी नाथजन्म आख्यान सादर केले. मध्यरात्री १२ वाजता श्रींचा लघुरुद्राभिषेक, पुष्पवृष्टी व कावडीचे पाणी असा प्रमुख सोहळा संपन्न झाला गुरुवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ ते ९ या वेळेत ग्रामस्थांकडून नैवेद्य, नारळ, शेरणी वाटप करण्यात आले. सकाळी ९ ते ११ या वेळेत ह.भ.प. भागवताचार्य काशिनाथ महाराज शास्त्रीयांचे हरिकीर्तन झाले.यावेळी ह.भ.प सुदर्शन महाराज, युवा नेते जयदत्त (भैय्या) धस, विजय गोल्हार,संजय गाढवे, रावसाहेब लोखंडे, उद्योजक पांडुरंग सोनवणे , शत्रुघ्न मरकड, पी.आय बाबासाहेब चव्हाण ,सरपंच दत्तात्रय खोटे , माऊली भोसले, राजू भोसले,समाजसेवक समीर शेख व गावातील ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुपारी १२.३० ते १ वाजता श्रींची सवाद्य मंदिर प्रदक्षिणा व शोभेची आतिषबाजी यांचे आयोजन करण्यात आले. सोहळ्याची सांगता दुपारी १:३० वाजता महाप्रसादाने झाली. महाप्रसादासाठी श्री. दादाराव सोनाजी खोटे, श्री. बिभीषण साहेबराव गवारे, श्री. मारुती त्रिंबक भोसले यांचे विशिष्ट योगदान राहिले. भजनी मंडळ, गायक, मृदंगाचार्य, कावडी फराळ पंगत, शोभेची दारू, मंडप-लाईट डेकोरेशन, पिण्याचे पाणी, फुलांची सजावट, छायांकन आदी विविध सेवेसाठी अनेक मान्यवरांनी सहकार्य केले. तसेच उदार देणगीदारांनी दिलेल्या अर्पणामुळे सोहळ्याला अधिक भर पडली. समस्त श्री भैरवनाथ भक्त, सांगवी (पा.) आणि पंचक्रोशीतील नागरिकांच्या पुढाकारातून हा सोहळा यंदाही भक्तिमय वातावरणात, शिस्तबद्ध आणि उत्साहपूर्ण पार पडत आहे. भक्तांच्या वाढत्या सहभागामुळे सांगवीतील भैरवनाथ जन्माष्टमी सोहळा हा परिसरातील एक महत्त्वाचा धार्मिक उत्सव म्हणून ओळखला जात आहे.

## पान १ वरून...

### राज्य सरकारला साखरेची

सुरू करण्यास दिरंगाई करीत आहे. त्यामुळे शेतकरी शेतमाल एमएसपीपेक्षा कमी दरात व्यापाऱ्यांना विकत असून, आर्थिक नुकसान सहन करीत आहेत.

------------

### तर विनोद तावडे होऊ शकतात

राष्ट्रीय स्तरावरील मोठ्या पक्षाला केवळ पाच जागांवर आघाडी मिळाली आहे. एनडीएच्या या दणदणीत यशामागे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या कल्याणकारी योजनांचा आधार तर आहेच, पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, भारतीय जनता पक्षाने (भाजप) आखलेली धडाकेबाज आणि अभेद्य रणनीती निर्णायक ठरल्याचे तज्ञांचे मत आहे. एनडीएच्या या विजयानंतर भाजपचे रणनीतिकार धर्मेंद्र प्रधान आणि विनोद तावडे यांचे नाव ठळकपणे समोर आले आहे. आता लवकरच भाजपा पक्षाचा राष्टीय अध्यक्ष निवडणार आहे. ही संधी मराठी नेते आणि भाजपाच्या राष्ट्रीय रणनितीत सहभागी असलेले विनोद तावडे यांना मिळू शकते असे राजकीय जाणकार बोलू लागले आहेत.

-------------

### भाजपचा बिहारमध्ये

विजय झाला असून, सर्वाधीक जागा मिळविण्यात पक्षाला यश आले आहे. बिहार विधानसभेच्या २४३ मतदारसंघांमध्ये ६ आणि ११ नोव्हेंबर रोजी दोन टप्प्यांत मतदान पार पडले. या दोन्ही टप्प्यांत मिळून २ हजार ६१६ उमेदवार रिंगणात होते. मुख्य लढत भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीविरुद्ध महाआघाडी यांच्यात होती, जनसुराज हा नवा पक्ष प्रथमच निवडणुकीत उतरला होता. बिहारमध्ये आजवर झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत ६० टक्क्यांपेक्षा अधिक मतदान होण्याचे प्रमाण खूप कमी वेळा दिसून आलेले आहे.

------------

### पालिका निवडणुकीत ना युती ना आघाडी

राज्यातील २४६ नगरपरिषद व ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम चार नोव्हेंबर रोजी घोषित केला गेला. चार वर्षापासून नगरपालिका, महानगरपालिका, नगरपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती यांच्या निवडणुका रखडल्या होत्या. आता नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांना मुहूर्त लागला आहे. त्यात काही महानगरपालिकांचा देखील समावेश आहे. विशेष म्हणजे निवडणुकीमधील आरक्षण पाहता अनेक ठिकाणी प्रस्थापितांना झटका बसला आहे. त्या ठिकाणी सर्वसामान्य व्यक्तीचे आरक्षण जाहीर झाल्याने प्रस्थापित पुढारी मात्र या निवडणुकीकडे फारसे गांभीर्याने पाहत नाहीत. अनेक विधानसभा, लोकसभा निवडणुकीत जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका या निवडणुका कार्यकर्त्यांसाठी असतात हे जाहीर भाषणात बोलले जाते. मात्र आता त्याच सर्वसामान्य कार्यकर्त्यांसाठी कोणीही पुढारी पुढे येताना दिसत नाही. बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारूर, परळी आणि अंबाजोगाई या सहा नगरपालिकेच्या निवडणुका आहेत. राज्यातील महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात लढत होईल, असे वाटत असताना बीड जिल्ह्यात परळी वगळता कुठेही महायुती दिसत नाही. विशेषतः अशीच अवस्था महाविकास आघाडीची देखील आहे. प्रामुख्याने सर्वच नगरपालिकेमध्ये सर्वच पक्ष स्वतंत्र निवडणूक लढवत असल्याने, आता सर्वच पक्षांची ताकद दिसणार आहे. विशेष बाब म्हणजे या निवडणुकीत प्रस्थापित पुढारी सरळ बाहेर फेकले गेले असून, आता त्यांना त्यांच्या कार्यकर्त्यांसाठी जीव तोडून काम करावे लागणार आहे. मात्र सध्या तरी तसे चित्र राज्यात कुठेच दिसून येत नाही. त्यामुळे अजूनही प्रस्थापित नेते सर्वसामान्य कार्यकर्त्यापासून दूर दूरच आहेत. थांबा, पाहू, वेळ आहे, ऐनवेळी निर्णय घेऊ, अशा वक्तव्यामुळे सर्वसामान्य कार्यकर्ता देखील संभ्रमात पडला आहे.

----------------

### राज्यात साथीच्या

कॉलरा(१९१), पिवळा ताप(६८७), गॅस्ट्रोएन्टरायटिस(४३), अतिसार(१,२३४) आणि टायफॉईड(२२) रुग्ण आढळले आहेत. बर्ड फ्लूचीही ७३ प्रकरणे नोंदली गेली आहेत. गडचिरोली जिल्ह्यात मलेरियाचे ६,०८८ रुग्ण आढळले आहेत. डेंग्यूचे नाशिकमध्ये ५७६ आणि ठाण्यात ४८८ रुग्ण नोंदले गेले. चिकनगुनियाचे पालघरमध्ये ३४३ आणि पुण्यात २३५ रुग्ण आहेत. लेप्टोस्पायरोसिसच्या ८१० रुग्णांपैकी एकाचा मृत्यू झाला आहे. स्क्रब टायफसच्या २८१ प्रकरणांमध्ये ९ जणांचा बळी गेला आहे.

**आरोग्य विभागाकडून सात सूत्री आराखडा**

आरोग्य विभागाने साथीच्या आजारांवर नियंत्रणासाठी सात सूत्री आराखडा तयार केला आहे. यात जलद सर्वेक्षण, कीटक नियंत्रण, फॉगिंग, कर्मचा-यांच्या प्रशिक्षण मोहिमांचा समावेश आहे. स्वाईन फ्लू, लेप्टोस्पायरोसिस, स्क्रब टायफस, इन्फ्लुएंझा व बर्ड फ्लूवरील नियंत्रणासाठीही स्वतंत्र कृती आराखडे तयार करण्यात आले आहेत. नागपूरसह सर्व जिल्ह्यांत आरोग्य निरीक्षण वाढविण्यात आल्याचे आरोग्य विभागाकडून सांगण्यात आले आहे.

---------

### मुलासाठी अजित पवार सरकारमधून

पवार पिता-पुत्रांना वाचवत आहेत, असे ते म्हणाले.

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या पुण्यातील कथित भूखंड घोटाळ्यामुळे राज्याचे राजकारण ढवळून निघाले आहे. दानवे म्हणाले की, शरद पवारांनी या प्रकरणी दिलेली प्रतिक्रिया अत्यंत बोलकी आहे. पार्थ पवारांना कसे वाचवले? हे फडणीसांनाच विचारा असे ते म्हणाले. यासंबंधी वर्षावर (मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान) मोठ्या घडामोडी घडल्या. माझ्या माहितीनुसार, त्या दिवशी वर्षावर झालेल्या बैठकीत अजित पवारांनी त्वेषाने बाहेर पडून बाहेरून सरकारला पाठिंबा देतो अशी भूमिका घेतली होती. ते पुढे म्हणाले, पुण्यातील भूखंड घोटाळा हा भाजपनेच बाहेर काढला. आता त्यांच्याकडूनच अजित पवार व पार्थ पवारांना वाचवले जात आहे. अंबादास दानवे यांनी ज्या बैठकीचा संदर्भ देवून अजित पवार सत्तेबाहेर पडणार असल्याचे विधान केले आहे, त्या बैठकीला आपण स्वत: हजर होतो, तेथे असा प्रकार घडलेला नाही, दानवे हे खोटे बोलत आहेत, असा खुलासा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला आहे.

----------

### एक कोटींहून अधिक लाडक्या

की, ई-केवायसीची अंतिम तारीख १८ नोव्हेंबर आहे आणि सध्या दररोज ४ ते ५ लाख महिलांची प्रक्रिया पूर्ण होत आहे. मात्र, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि उत्तर महाराष्ट्रात झालेली अतिवृष्टी आणि पूरस्थितीमुळे अनेक महिलांची महत्त्वाची कागदपत्रे खराब झाली आहेत किंवा गमावली गेली आहेत. त्यामुळे, पात्र लाभार्थी लाभापासून वंचित राहू नये, यासाठी ई-केवायसीसाठी मुदतवाढ देण्याबाबत लवकरच निर्णय घेतला जाईल. या योजनेच्या १ कोटीहून अधिक महिलांची केवायसी पूर्ण झाली असताना, काही महिलांना मात्र तांत्रिक अडचणी येत होत्या. ज्या महिला एकल आहेत, ज्यांचे पती किंवा वडिलांचे निधन झाले आहे किंवा ज्या घटस्फोटित आहेत, अशा महिलांना ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करताना अडथळे येत होते. यावर मार्ग काढण्यासाठी महिला व बालविकास विभागाने तातडीने वेबसाईटमध्ये तांत्रिक बदल करण्याची घोषणा केली आहे. या महिलांना आता ई-केवायसी करताना पती/वडिलांचे मृत्यू प्रमाणपत्र किंवा घटस्फोटाचे कागदपत्रे अपलोड करण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला जाईल, अशी माहिती तटकरे यांनी दिली.

----------

### मनोज जरांगेंच्या हत्येचा कट

कांचन साळवीला पोलिसांनी अटक केली होती. दादा गरड आणि अमोल खुणे यांच्याशी कांचन साळवीचा सबंध असल्याचा आणि तो धनंजय मुंडे यांचा पीए असल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला होता. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली होती.

--------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर २०२५


## थोडक्यात....



### राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये बाल दिनानिमित्ताने पंडित जवाहरलाल नेहरू यांना अभिवादन

किल्ले धारूर । प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये बाल दिनानिमित्ताने पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, कार्यालय अधीक्षक सुभाष वायाळ, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनायक कापावार, डॉ. नितीन कुंभार, डॉ. अनंथा गाडे, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड, डॉ. गोपाळ सगर, प्रा. सिद्धेश्वर काळे, प्रा. गहिनीनाथ गोयेकर, प्रा. जगदीश शिंदे, प्रा. अण्णासाहेब शिंदे यांबरोबर प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

### तुलसी व माता रमाई नर्सिंग कॉलेजमध्ये जागतिक मधुमेह दिन संपन्न




वडवणी । प्रतिनिधी

१४ नोव्हेंबर २०२५ रोजी तुलसी कॉलेज ऑफ नर्सिंग व माता रमाई कॉलेजमध्ये जागतिक मधुमेह संपन्न करण्यात झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुनील जोंधळे सर ,प्रमुख अतिथी डॉ. प्रदीप उजगरे ,प्राचार्य डॉ.विजयकुमार बांदल ,प्राचार्य ढोकणे सर, प्रा मगन ओव्हाळ सर ,डॉ. धेंडे मॅडम व या नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य राऊत डी.डी.यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमांमध्ये डॉ. प्रदीप उजगरे यांनी मधुमेह आजाराबद्दल समज –गैरसमज, मधुमेह होण्याची प्रमुख कारणे, मधुमेह झाल्यास काय करावे ?काय केले पाहिजे ? आणि मधुमेह टाळण्यासाठी साखरेचे प्रमाण प्रमाणात ठेवणे किती आवश्यक आहे याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने मधुमेह दिनाचे औचित्य साधून निबंध स्पर्धा आयोजित केल्या होत्या त्या निबंध स्पर्धेमध्ये तुलसी कॉलेज ऑफ नर्सिंग चे विद्यार्थी व माता रमाई नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी यांनी भाग घेतला त्यामध्ये प्रथम द्वितीय व तृतीय आलेले विद्यार्थी खालील प्रमाणे कु.भारती लांडगे सर्वप्रथम ,श्रीनिकेत देवकते द्वितीय तर अंजली कुरकुटे तिसरी आली तसेच तसेच दुसऱ्या कॉलेजमधील अर्पिता गायकवाड प्रथम ,सुप्रिया पानसंबळ दुसरी ,राहुल वाघमारे तिसरा तर कार्तिकी वीर उत्तेजनार्थ म्हणून यश संपादन केले. या सर्व यशस्वी स्पर्धकांचे पुष्पगुच्छ एक पुस्तक , प्रमाणपत्र व एक पेन देऊन सर्वांचे स्वागत करण्यात आले.यावेळी प्रा.वेडे मॅडम ,प्रा. सुप्रिया वाघमारे, प्रा.मिलिंद वडमारे ,प्रा. अब्रार पठाण ,प्रा.इनामदार, प्रा. डॉ धेंडे यांनी विशेष परिश्रम घेतले व हा कार्यक्रम यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी मेहनत घेतली

## सहभागातून समृद्धीकडे लोक चळवळ उभी करा - सीईओ रहमान

बीड । प्रतिनिधी

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरू झालेले आहे. या अभियानांतर्गत ग्रामपंचायतींनी स्वच्छता, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि रोजगार निर्मिती यांसारख्या क्षेत्रांत प्रगती साधण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात आपल्या जिल्ह्याचे नाव रोशन होण्यासाठी जिल्ह्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सहभागातून समृद्धीकडे या संकल्पनेनुसार ही लोक चळवळ उभा राहायला हवी, असे आवाहन बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी केले.**




बीड येथे जिल्हा परिषदेच्या सभागृहात गुरुवारी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांच्या संकल्पनेतून सहभागातून समृद्धीकडे संकल्प सभा झाली.सभेसाठी ११ तालुक्यातील ऑनलाईन पंचायत समितीतील सर्व सरपंच ग्रामपंचायत अधिकारी आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

उपमुख्य कार्यकारी अधिकारी काळे आपल्या प्रस्ताविकामध्ये म्हणाले की , मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरू झाले आहे. या जिल्ह्यातील सर्व ग्राम पंचायतींनी हिरीने सहभागी व्हावे. या अभियानाचे कार्य, उद्दीष्टे समजून घेऊन गावागावत ही लोक चळवळ तयार करावी असे आवाहन त्यांनी केले.

सभेसाठी ११ तालुक्यातील ऑनलाईन पंचायत समितीतील सर्व सरपंच ग्रामपंचायत अधिकारी आजी माजी पदाधिकारी हे सर्व जोडले गेले होते. या सर्व सभेला संबोधित करता वेळेस महा यशदाचे उपमहासंचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी आठ घटकावर आवर्जून काम करावे तसेच शाश्वत विकासाची १७ ध्येय नऊ संकल्पना यावर गावाचा सर्वांगीण शाश्वत विकास करावा आणि आपल्या जिल्ह्याचे नाव रोशन करावे असं मत मांडले, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी यांनी आपल्या तालुक्याचे, आपल्या गावचे, आपल्या जिल्ह्याचे नाव पुढे येण्यासाठी आवर्जून मदत करणे गरजेचे आहे. सहकार्य करणे गरजेचे आहे, असे आवाहन त्यांनी केले.

मोठ्या उत्साहात कार्यक्रम संपन्न झाला कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी यांचे आभार जिल्हा व्यवस्थापक अशोक खरसाडे यांनी मानले.

## काडीवडगाव जि.प.शाळेत बालदिन मोठ्या उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील काडीवडगाव येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिन मोठ्या उत्साहपूर्ण आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक रविंद्र वावळकर हे होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. बहिरवाळ सर, श्री. बडे सर, अंगणवाडी सेविका श्रीम. जयश्रीताई बादाडे, श्रीम. ललिता वावळकर, श्रीम. कांचन टिळे,

श्रीम. जनाबाई मोहन राऊत इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंडित नेहरू यांच्या प्रतिमेचे पुष्प अर्पण करण्यात करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्या नंतर शाळेतील निवडक विद्यार्थ्यांनी नेहरूंच्या बाल प्रेमाबद्दल, शिक्षणाचे महत्त्व, स्वच्छता, पर्यावरण, शाळेतील मूल्य शिक्षण, तसेच आजच्या मुलांवर असलेल्या जबाबदाऱ्या या विषयांवर सुंदर, प्रेरणादायी व प्रभावी विचार मांडले. काही निवडक विद्यार्थ्यांच्या प्रभावी व आत्मविश्वासपूर्ण भाषणांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण



मांडणीला उपस्थित मान्यवर, शिक्षक आणि पालकांनी उत्स्फूर्त दाद दिली. मुलांच्या वक्तृत्व कौशल्याचे सर्वांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या भाषणानंतर शाळेतील

श्री बडे सर व श्री बहिरवाळ सर यांनी आपले विचार मांडले. अध्यक्ष मार्गदर्शन करताना शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र वावळकर यांनी पंडीत नेहरूंचे बालप्रेम, शिक्षणाविषयीचे विचार मांडले विद्यार्थ्यांना बालदिनाचे महत्त्व सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेची भूमिका यावर मार्गदर्शन करताना श्री रवींद्र वावळकर म्हणाले की, आपल्या शाळेतील या गोड विद्यार्थ्यांच्या ठायी असलेले विचार, सर्जनशीलता आणि आत्मविश्वासच त्यांचे उज्ज्वल भवितव्य घडवतील. त्या कामी पालक आणि शिक्षकांचे मोलाचे सहकार्य कायम राहणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अंजली हातागळे व कु. रुंजी बादाडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षकवर्ग, कर्मचारी, तसेच ग्रामस्थांचे सहकार्य लाभले.

## पौंडूळ फाट्याजवळ अवैध वाळूचा ट्रक पकडला

बीड । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील पौडूळ फाट्याजवळ अवैध वाळू वाहतूक करताना ट्रॅक्टर पकडण्यात आला. हा ट्रॅक्टर साक्षाळ पिंपरी रोडने जात होता. ही कारवाई शिरूर पोलिसांनी १४ नोव्हेंबर रोजी पहाटे तीनच्या सुमारास केली.



दिनांक १४/११/२०२५ रोजी पहाटे अंदाजे ०३.०० वाजता शिरुर पोलीस ठाण्याचे कर्मचारी नाईट पेट्रोलिंग करत असताना, गोपनीय बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, साक्षाळपिंपरी रोडने पौडूळ फाट्याकडे इसम वाळूने भरलेला ट्रॅक्टर घेऊन येत आहे. त्यानुसार पोलीस पथकाने पौडूळ फाट्यावर सापळा लावला असता, एक लाल रंगाचा महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर वाळूने भरलेला दिसून आला. त्याचा पाठलाग करून तो ट्रॅक्टर ताब्यात घेण्यात आला. चौकशीत सदर ट्रॅक्टर चालकाचे नाव भाऊसाहेब विश्वंभर काशीद असे असून, वाळू अनधिकृतपणे वाहतूक करत असल्याचे निदर्शनास आले. या संदर्भात पोलीस स्टेशन शिरुर कासार येथे गु.र.नं. ३१४/२०२५ कलम ३०३(२), ३(५) बी.एन.एस. अन्वये ट्रॅक्टर चालक व पाहिजे आरोपी ट्रॅक्टर मालक यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर आरोपीकडून खालीलप्रमाणे मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे

महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर किंमत ₹५,००,०००/-
वाळू किंमत ₹८,०००/-

एकूण मुद्देमाल किंमत ₹५,०८,०००/- ही कारवाई वरीष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर कासार पोलीस ठाणे चे सहा पोलीस निरीक्षक प्रवीण जाधव, पोह/४८१ ऊबाळे, पोशी २२२१ सतीश बहिरवाळ यांनी केली.सदर कारवाईमुळे अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांना प्रतिबंध लागून अशा प्रकारच्या बेकायदेशीर वाहतुकीवर आळा बसण्यास मदत झाली आहे.

## रा.काँ.शरदचंद्र पवार पक्षाकडून 'वोट जिहाद'ची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न

### बीडमध्ये नगराध्यक्षपदासाठी एससी महिला नव्हे मुस्लिमच उमेदवार : केशव रत्नपारखे

बीड । प्रतिनिधी

बीड नगरपरिषदेच्या इतिहासात प्रथमच अनुसूचित जातीच्या (एससी) महिलेसाठी नगराध्यक्षपद राखीव आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून लोकसभा व विधानसभा निवडणुकीप्रमाणे पुन्हा एकदा बीड नगरपरिषद निवडणुकीत 'वोट जिहाद'ची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. एससी महिलेला नगराध्यक्ष पद राखीव असतानाही अप्रत्यक्षरीत्या मागासवर्गीय महिलेच्या आडून मुस्लिम व्यक्तीलाच प्रतिनिधित्व देण्याचा घाट घातला जात आहे, असा आरोप हिंदुत्ववादी संघटनांकडून केला जात आहे.

समस्त हिंदू आघाडीचे केशव रत्नपारखे यांनी पत्रकात म्हटले की, बीड नगरपरिषदेचे नगराध्यक्ष पद



अनुसूचित जातीच्या महिलेसाठी राखीव आहे. या पदावर खऱ्या अर्थाने आंबेडकरी विचारसरणी असलेल्या उमेदवाराला संधी मिळेल, अशी अपेक्षा समाजातून होती. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व बीडचे आमदार यांनी अप्रत्यक्षरीत्या मुस्लिम उमेदवाराला प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला आहे. "लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये 'वोट जिहाद'च्या स्वरूपात काय घडले होते, हे आपण पाहिले आहे. त्याचीच पुनरावृत्ती बीड नगरपरिषद निवडणुकीत होताना दिसत आहे. त्यामुळे विकासाचे कोणतेही व्हिजन नसलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा हा कुटील डाव जनतेने लक्षात घेण्याची वेळ आली आहे. केवळ मतापुरता मागासवर्गीय व मुस्लिमांबद्दलचा पुळका दाखवायचा आणि मते मिळवायची हा शरद पवारांच्या पक्षासह नेत्यांचा जुना फंडा झाला आहे. त्यामुळे आता राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा 'वोट जिहाद'ची पुनरावृत्ती करण्याचा प्रयत्न हाणून पाडावा, असा इशारा समस्त हिंदू आघाडीचे केशव रत्नपारखे यांनी दिला आहे.

## राजकिशोर मोदी यांनी प्रभाग १ व प्रभाग २ मधील नागरिकांच्या घरोघरी जाऊन गाठीभेटी घेत प्रचाराचा केला श्रीगणेशा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई नगर परिषदेची निवडणूक जाहीर झाली असून त्यामध्ये दिवसेंदिवस निवडणूकित रंग भरत असल्याचे दिसून येऊ लागले आहे. याच अंबाजोगाई नगर परिषदेच्या रणधुमाळीत नगराध्यक्ष पदाचे प्रमुख उमेदवार राजकिशोर मोदी यांनी त्या त्या प्रभागातील आपल्या सहकारी उमेदवारांना घेऊन प्रभागातील मतदारांच्या प्रत्यक्ष घरोघरी जाऊन त्यांच्या गाठीभेटी घेत प्रचाराचा श्रीगणेशा केला आहे. गुरुवार दि १३ रोजी प्रभाग क्रमांक १ मधून मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेत प्रचाराचा शुभारंभ केला. शुक्रवार दि १४ रोजी प्रभाग क्रमांक २ मधील सर्व मतदारांना सहकार्य करण्याची व मतदान रुपी आशिर्वाद देण्याची साद राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकारी उमेदवारांनी दिली. याप्रसंगी राजकिशोर मोदी यांच्या समवेत प्रभाग क्रमांक १ मधील प्रमुख उमेदवार संकेत राजकिशोर मोदी व हाजी शेख व त्या प्रभागातील अनेक सहकारी उपस्थित होते. तर प्रभाग क्रमांक २ मध्ये तेथील प्रमुख उमेदवार अंकुश हेडे व मणियार



व त्या प्रभागातील प्रमुख सहकारी हे सहभागी होते.

प्रभागातील या भेटीदरम्यान राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांचे मतदारांच्या कडून उत्स्फूर्तपणे स्वागत केल्या जात होते. त्याचबरोबर जागोजागी सुवासिनींकडून औक्षण देखील केल्या जात होते. यावरून राजकिशोर मोदी यांच्या प्रति मतदारांचा विश्वास व प्रेम दिसून येत होते. अंबाजोगाई शहर हे मोदी कुटुंबाला मानणारे शहर आहे. त्याच्याच सहकार्य व आशीर्वादाने राजकिशोर मोदी हे मागील अनेक वर्षे अंबाजोगाई नगर परिषदेच्या माध्यमातून शहर वासीयांची सेवा करत आहेत. आपल्या पित्याच्या समाजसेवेचा राजकीय वसा पुढे चालवण्यासाठी त्यांचे सुपुत्र संकेत मोदी हे त्यांच्या आयुष्यातील पहिलीच निवडणूक लढवीत आहेत. संकेत मोदी हे शैक्षणिक ,सामाजिक व सांस्कृतिक चळवळीत आपला सक्रिय सहभाग घेऊन त्यातून त्यांनी युवकांची एक नवीन फळी तयार केली आहे. संकेत मोदी यांनी गणेशोत्सव काळात अंबाजोगाई शहरातील गणेश मंडळाच्या ढोलताशा वाद्य स्पर्धा घेऊन अंबाजोगाई चे ढोल पथक साऱ्या महाराष्ट्र भर पोचवले आहे. त्याचबरोबर नवरात्र उत्सवात दांडिया स्पर्धेची उत्कृष्ट अशी स्पर्धा आयोजित करून येथील महिला, युवक व युवतींना एक व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून संकेत मोदी हे अंबाजोगाई शहरातील घराघरात पोचले आहेत.अंबाजोगाई नगर परिषदेच्या निवडणूक प्रचारादरम्यान राजकिशोर मोदी हे त्यांनी आजपर्यंत केलेल्या विकासकामांच्या बळावरच यापुढेही मतदान रुपी आशिर्वाद मागत आहेत. अंबाजोगाई शहर हे एक कुटुंब म्हणून आपण काम केले असून येथील नागरिकांनी देखील भक्कम अशी साथ दिली आहे. यापुढेही शहराच्या सर्वांगीण विकासासाठी राजकिशोर मोदी व त्यांच्या संपूर्ण सहकार्यांना पाठबळ देण्याचे आवाहन या प्रचारादरम्यान राजकिशोर मोदी मतदारांना करत आहेत. मतदार देखील खंबीरपणे मोदी कुटुंबाच्या पाठीशी राहण्याचे अभिवचन देतांना दिसून येत आहेत. शहरातील मतदार नवयुवक, महिला व जेष्ठ नागरिक यांच्या कडून मिळत असलेले प्रेम पाहून मोदी व त्यांचे सहकारी भारावून जात आहेत व त्यांच्यात पुन्हा जोमाने काम करण्याची ऊर्जा संचारत असल्याची भावना निर्माण होत आहे.


## जाहीर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**
**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.६८७/२०२५**
**राजेंद्र विष्णू वाघमारे विरुद्ध ग्रा.पं.कार्या पाटोदा (बे.)**

पहा

१ राजेंद्र विष्णू वाघमारे, रा. पाटोदा बेलखंडी, ता. जि. बीड उपरोक्त प्रमाणे जन्म मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञमार्फत वा कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारकः राजकन्या राजेंद्र वाघमारे याचा दिनाक ३०/१०/२०१० रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू नोंदवहीमध्ये घेणे बाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार यास जन्मयी नोंद ग्रामपंचायत कार्यालय न प. कार्यालयास पाटोदा (बे.) ता बीड येथिल जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की. जर सदरहू मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदहुन जन्म नोद ग्रामपंचायत कार्यालय मौजे पाटोदा (बे) ता. जि. बीड येथील जन्म-मृत्यु रजिस्ट्ररला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक १४/११/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख १४/१२/२०२५ ही आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार बीड**


## पान ६ वरून...

### दिवसा घरफोडी करणारा

गु.र.नं २७०/२०२५ कलम ३३१(३), ३०५ बी.एन.एस,५. पोलीस ठाणे शिरुर गु.र.नं २८९/२०२५ कलम ३३१ (३), ३०५ बी. एन.एस असे गुन्हा दाखल आहेत.संदीप ईश्वर भोसले, वय ३० वर्ष, रा बेलगांव ता कर्जत जि अहिल्यानगर हा पोलीस अभिलेखावरील आरोपी असुन त्याचे वर दरोडा, चोऱ्या, घरफोड्या, खुन, खुनाचा प्रयत्न या सारखे २० पेक्षा जास्त गुन्हे दाखल आहे. त्याचे वर यापुर्वी म.को.का प्रमाणे कारवाई देखील करण्यात आलेली होती. सदरील कामगिरी हि नवनित काँक्त, पोलीस अधीक्षक, बीड, सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, शिवाजी बटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक धनराज जास्वाल, पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार सोमनाथ गायकवाड, अशोक दुबाले, बाळु सानप, राहुल शिंदे, विकास राठोड, अंकुश वरपे, आश्पाक सय्यद, मनोज परजणे, विकी सुरवसे, चालक पोलीस हवालदार नितीन वडमारे, सिध्दार्थ मांजरे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड यांनी मिळून केली असुन पुढील तपास स्थागुशा, बीड व पोलीस स्टेशन पिंपळनेर येथील पोउपनि विलास तुपारे व पोअं/विश्वास मगर, सादेक पठाण हे करत आहेत.

### ऐ.डी.फाउंडेशनचा महाराष्ट्र

खाऊ याचे वाटप केले जाते.छोट्या गोष्टीतून माणसं जोडणे,अडीअडचणी सोडवणे हा अनिता ताईंचा स्वभाव आहे.त्यांच्या या कार्याची नोंद घेऊन पुरस्कार देऊन सन्मानित केले जाणार आहे. एका गृहिणीला, सर्वसामान्य स्त्री चा खऱ्या अर्थाने सन्मान होत असल्याने अनिता ठाकुर यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर

मतपत्रिका छपाईवर निबंध घालणेबाबत. धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण करण्यावर निर्बंध,धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास निबंध घालणे. मोटारगाड्या वाहनांचा ताफ्याचा वापर करण्यास निर्बंध घालण्याबाबत.प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर पक्ष प्रचारांचे कापडी फलक, झेंडे लावणे इ. बाबींसाठी निबंध घालणे, ध्वनीक्षेपकाचे वापराबाबत निबंध सार्वजनिक इमारतीचे ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, रहदारीस अडथळा निर्माण न होवू देण्यासाठी निबंध घालण्याबाबत. खाजगी व्यक्तींच्या जागेवर/ सार्वजनिक जागेवर झेंडे, भित्तीपत्रके लावण्यास निर्बंध घालणे, उपरोक्त प्रमाणे आदेशांचे पालन सर्व शासकीय निमशासकीय कार्यालय, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था सर्व राजकीय पक्ष, उमेदवार व नागरिकांनी करावेअसे आवाहन जिल्हाधिकारी विविक जॉन्सन यांनी केले आहे.

### यशस्वी होण्यासाठी जिद्द महत्त्वाची

सहभाग आवश्यक आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांनी विविध खेळामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. राख एम.एस., प्रा. बदरे ए.ए., प्रा.देशमुख आर.बी., प्रा.शेख एम.आय., प्रा.गोयकर एम.बी., प्रा.धुमाळ एम.डी., प्रा.देशमुख एस.व्ही, प्रा.गायकवाड व्ही.एस., प्रा.गायकवाड वाय.एम. यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी पवार एस.जी., मोटे जी.आर., शिंदे आर.आर., शिंदे आर.आर., नाटकर आर.ई.,माने वाय.डी., काळे ए.एस., पवार पी.आर., शिंदे पी.बी., मडिकर ओ.एस. यांनी परिश्रम घेतले. यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज

राऊत, सभापती सुवर्णाताई लांबरुड, सरपंच परिषद मुंबई महाराष्ट्राचे सर्व पदाधिकारी हे उपस्थित होते.

सभापती प्रा. राम शिंदे पुढे बोलताना म्हणाले की,सरपंच संघटन हे अत्यंत अवघड असून सतत सदैव संघर्षशील भूमिका त्यांना बजवावी लागते. दत्ता काकडे यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक सरपंच परिषदेचा कार्यविस्तार वाढवला असून सरपंचांना सन्मान देण्याचे काम केले आहे. लवकरच जनगणनेचे काम सुरू होणार असून लोकसभा मतदार संघाच्या जागा वाढणार आहेत. अध्यक्षीय समारंभामध्ये आ. सुरेश धस यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार गोरे यांच्या कार्यपद्धती विषयी गौरव उद्गार काढून सतत ग्राम विकासाबाबत अत्यंत सकारात्मक असणारे मंत्री आहेत त्यामुळेच सर्व निवडणुकांमध्ये भारतीय जनता पार्टीचा स्ट्राइक रेट वाढतो आहे असे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे यांनी केले. शिवतीर्थ या निवासस्थानाचा गृहप्रवेश छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे अनावरण आणि मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान संवाद मेळावा या सर्व कार्यक्रमांचे बहारदार सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक निलेश दिवटे आणि प्रसिद्ध निवेदक बाळासाहेब तळेकर यांनी केले.या कार्यक्रमास बीड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ.शिवाजी राऊत,बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे युवक जिल्हाध्यक्ष सतीशआबा शिंदे,किशोरनाना हंबर्डे,सभापती बद्रीनाथ जगताप,युवराज पाटील, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख,चेअरमन आदिनाथ सानप,राष्ट्रवादीचे नेते अण्णासाहेब चौधरी,गौतम आजबे,सरपंच परिवंत गायकवाड,सरपंच पंडित पोकळे, भाऊसाहेब लटपटे, सुनील नाथ, सतीशशेठ धस, बबन डोके,भीमराव बोडखे, सुधीर पठाडे, दादा पांडुळे, प्रतिभा थोरवे,गंगाधर आजबे आदि मान्यवर उपस्थित होते.

### भुरेवाडी-मातावळीत

या ठिकाणाहून अवघ्या दहा किलोमीटर असलेल्या मातावळी येथेही दुपारी दीडच्या सुमारास बिबट्याने शेळीवर हल्ला करून शेळी फस्त केली. वनविभागाचे अधिकारी शेळके यांना हा प्रकार सांगितल्यानंतर त्यांनी ऑनलाईन करण्यासाठी शेतकऱ्यांना कार्यालयात बोलावले आणि ऑनलाईन झाल्यानंतरच याचे पोस्टमार्टम आणि पंचनामे होतील असे सांगितले. शनिवारी या दोन्ही ठिकाणी पंचनामे होणार असल्याचे शेळके यांनी सांगितले. सुरवातीला वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी दखल न घेतल्याने नागरिकांनी या भागाचे आमदार सुरेश धस यांना याबाबत माहिती दिल्यानंतर त्यांनी वरिष्ठ अधिकारी मुंडे यांना कळवले. त्यांनी आपल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना तात्काळ सूचना करून या संदर्भात कारवाई करण्यासाठी सांगितले. दरम्यान शेळके यांनी दोन्ही ठिकाणच्या शेतकऱ्यांना कार्यालयात बोलावून त्यांची कागदपत्रे ऑनलाईन करण्याची प्रक्रिया पूर्ण केली असून शनिवारी या दोन्ही ठिकाणी पंचनामे होतील असे शेळके यांनी सांगितले.

जिल्ह्यात दोन पिंजरे

नागरी भागात घुसलेल्या हिंस्त्र स्वापदांना पकडण्यासाठी बीड जिल्ह्यामध्ये दोन पिंजरे उपलब्ध असून असे प्रकरण घडल्यानंतर संबंधित ठिकाणी पिंजरे लावण्यात येतील असेही यावेळी शेळके यांनी सांगितले.

# आयसीएआरने विकसित केलेल्या गव्हाच्या सहा वाणांवर पंजाब कृषी विद्यापीठाचा आक्षेप

दिल्ली : भारतीय कृषी संशोधन परिषदेने (आयसीएआर) प्रसारित केलेल्या भात पिकाच्या जनुकीय संपादित वाणावरून वाद सुरु असतानाच पंजाब सरकारने आयसीएआरच्या काही गव्हाच्या नवीन वाणांवर आक्षेप घेतला आहे. आयसीएआरने विकसित केलेल्या नवीन गव्हाच्या वाणांच्या वापराला पंजाबमध्ये परवानगी न देण्याचे संकेत दिले आहेत.

करनाल येथील आयसीएआरच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ व्हीट अँड बार्ली रिसर्चने नवीन गव्हाचे वाण विकसित केले आहे. परंतु या वाणांना रासयनिक खतांची प्रमाणापेक्षा जास्त गरज असल्याचा दावा करत पंजाब कृषी विद्यापीठाने याबाबत आयसीएआरकडे हरकत नोंदवली आहे. त्यामुळे आयसीएआरच्या नवीन वाणांच्या चाचण्यावरून गोंधळ निर्माण झाला आहे.



करनाल येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ व्हीट अँड बार्ली रिसर्चने डीबीडब्ल्यू ३०३, डीबीडब्ल्यू ३२७, डीबीडब्ल्यू ३३२, डीबीडब्ल्यू ३७०, डीबीडब्ल्यू ३७१ आणि डीबीडब्ल्यू ३७२ ही गव्हाची नवीन सहा वाण विकसित केली आहेत. परंतु या वाणांची नियमित चाचणी न करता आयसीएआरने उच्च खताच्या चाचण्या घेऊन त्यांना मान्यता दिल्याचा पंजाब कृषी विद्यापीठाचा दावा आहे. या वाणांना इतर गव्हाच्या वाणांच्या तुलनेत ५० टक्के अधिक नत्र, स्फुरद आणि पालाश द्यावे लागतं. तरच अपेक्षित उत्पादन मिळतं, अशी माहिती पंजाब कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक अजयसिंह धत्त यांनी पंजाब सरकारला दिली. तसेच या वाणांची शिफारस शेतकऱ्यांना करता येणार नसल्याचे धत्त म्हणाले. ''हे वाण शिफारस केलेल्या सामान्य खत मात्रेसाठी अधिसूचित करण्यात आले नाहीत. पंजाब कृषी विद्यापीठ नेहमीच संतुलित निविष्ठा वापराचे समर्थन करते. त्यामुळे पंजाबमधील शेतकऱ्यांना हे वाण पेरणीसाठी शिफारस करण्यात येणार नाही,'' असेही धत्त यांनी स्पष्ट केले. शेतकरी जर इतर गव्हाच्या एखाद्या वाणाला २ पोती युरिया वा एनपीके किंवा डीएपी वापरत असेल, तर या वाणांसाठी ३ पोती खत घालावी लागतात. त्याशिवाय शेणखत आणि ग्रोथ रेग्युलेटर वापरल्यासच अपेक्षित उत्पादन मिळत असल्याचा दावाही धत्त यांनी केला आहे. त्यामुळे या प्रकाराबद्दल पंजाब कृषी विद्यापीठाने आयसीएआरकडे स्पष्टीकरण मागवले आहे. यावर आयसीएआरच्या सुत्रांनी देखील या दाव्याला पुष्टी दिली आहे. या वाणांचे उत्पादन हेक्टरी ७.५ ते ८ टन आहे.

परंतु इतर वाणांच्या तुलनेत मात्र ५ ते ६ टन अधिक खत आवश्यक आहे. तसेच लवकर पेरणीसाठी ही वाण विकसित केली असल्याने त्यासाठी अधिक खतांची गरज असल्याचे त्यांनी मान्य केले आहे. परंतु पंजाब कृषी विद्यापीठाने विकसित केलेले पीबीडब्ल्यू हे वाण आणि आयसीएआरने विकसित केलेल्या डीडब्ल्यूआर मालिकेतील वाण यामधील गुणधर्म सारखेच असून त्याची चाचणी उच्च खत मात्रेवरच केल्याचा दावा आयसीएआरमधील सुत्रांनी केला आहे. त्यामुळे हा वाद अधिक तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## बोगस बियाण्याला आळा घालण्यासाठी नवीन कायदा येणार



केंद्र सरकारकडून हालचाली, कृषिमंत्री चौहान यांनी दिले होते संकेत

मुंबई : बोगस बियाण्याला आळा घालणारा नवीन कायदा आणण्यासाठी केंद्र सरकारने हालचाली सुरु केल्या आहेत. अलीकडेच केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी नवीन बियाणे विधेयक सादर करण्याचे संकेत दिले होते.

केंद्रीय कृषी मंत्रालयाने नवीन बियाणे कायद्याचा मसुदा सार्वजनिक सल्लामसलतीसाठी जारी केला आहे. या मसुद्यावर ११ डिसेंबरपर्यंत सर्व भागधारकांकडून सूचना आणि टिपणी मागवण्यात आल्या आहेत. २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात नवीन बियाणे विधेयक संसदेत मांडण्यात येण्याची शक्यता आहे. नवीन कायदा बियाणे कायदा, १९६६ आणि बियाणे (नियंत्रण) आदेश, १९८३ ऐवजी राबवण्यात येणार आहे.

बियाणे क्षेत्राचे नियमन आणि सध्याच्या कृषी व बाजारपेठेच्या गरजांची सांगड घालणे हे या विधेयकाचे उद्दिष्ट आहे, असा दावा कृषी मंत्रालयाने केला

कृषी मंत्रालयाने जारी केलेल्या मसुद्यात उद्दिष्ट स्पष्ट करण्यात आली आहेत. यामध्ये बियाण्यांच्या गुणवत्तेवर नियंत्र ठेवणे, शेतकऱ्यांना परवडणाऱ्या दरात उच्च दर्जाचे बियाणे उपलब्ध करून देणे, बनावट आणि निकृष्ट बियाण्यांवर अंकुश ठेवणे, नवीन बियाण्यांची आयात करणे आणि शेतकऱ्यांच्या हक्कांचे संरक्षण निश्चित करणे यांचा समावेश आहे.

या विधेयकात किरकोळ नियमभंगाकडे गुन्हा म्हणून न बघता त्यांना किरकोळ दंड देण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे व्यवसायांवरील ताण कमी होईल, असा मंत्रालयाचा विचार आहे. परंतु गंभीर प्रकारच्या गुन्ह्यासाठी मात्र कठोर दंड कायम असतील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. या प्रस्तावामुळे व्यवसाय सुलभ होईल, असा दावा केला जात आहे.

## आवळा हे भारतीय उपखंडातील सर्वात महत्त्वाचे औषधी फळ

आवळा हे भारतीय उपखंडातील सर्वात महत्त्वाचे औषधी व आरोग्यवर्धक फळ आहे. आवळा फळ क जीवनसत्व व टॅनिनचासमृद्ध स्त्रोत आहे. फळांमध्ये सरासरी १०० ग्रॅम मध्ये ७०० मिलिग्रॅम अस्कोब्रिकअँसिड आणि लोह, प्रथिने, खनिजे आणि जीवनसत्त्वे आढळतात. महाराष्ट्रामध्ये आवळा लागवडीसाठी कृष्णा, कांचन एनए-१० व एनए-७ या जातींची शिफारस आहे. जमिनीचा पोत व पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन आवळ्यामध्ये आंतरपिके घ्यावीत.

सुधारित जाती : महाराष्ट्रामध्ये लागवडीसाठी कृष्णा, कांचन, एनए - १० व एनए-७या जातींची शिफारस आहे. राष्ट्रीय अजैविक ताण व्यवस्थापन संस्थेमध्ये.

बनारसी : फळांचे वजन ४०-४५ ग्रॅम, साखरेचे प्रमाण १२.५ टक्के आम्लता १.५ टक्के फळांच्या १०० ग्रॅमखाण्यायोग्य भागात ६५० मिलिग्रॅमक जीवनसत्त्व असतात. उत्पादन ३५-३८ किलो प्रति झाड

कृष्णा (एन.ए-५) : फळांचे वजन ३०-४० ग्रॅम, साखरेचे प्रमाण ११.५ टक्के,आम्लता १.४ टक्के,१०० ग्रॅम खाण्यायोग्य भागात ४७५ मिलिग्रॅम क जीवनसत्व असते.

चकैया : फळांचे वजन ३०-३२ ग्रॅम, फळांच्या १०० ग्रॅम खाण्यायोग्य भागात पाचशे मिलिग्रॅम क जीवनसत्व असते. उत्पादन ३० किलो प्रति झाड

कांचन : फळांचे वजन ३०-३२ ग्रॅम, साखरेचे प्रमाण १० टक्के, आम्लता १.४५ टक्के फळांच्या १०० ग्रॅम खाण्यायोग्य भागात ५०० मिलिग्रॅम क जीवनसत्व असते.

आनंद :फळांचे वजन ३५ ग्रॅम, जीवनसत्व क ७७० मिलिग्रॅम प्रति १०० ग्रॅम असते उत्पादन १७- ८० किलो प्रति झाड

बी.एस.आर. : फळांचे सरासरी वजन २७ ते ३० ग्रॅम फळांमध्ये साखरेचे प्रमाण ११० टक्के जीवनसत्व क चे प्रमाण १०० ग्रॅम ला ६२० मिलिग्रॅम उत्पादन ४० - ४५ किलो प्रति झाड.

बलवंत : फळांचे वजन ४० ग्रॅम साखरेचे प्रमाण ९.९० टक्के आम्लता २.१७ टक्के जीवनसत्व क चे प्रमाण १०० ग्रॅम ला ५२८ मिलिग्रॅम असते. उत्पादन ४२ किलो प्रति झाड.



## या प्रजातीच्या वांगी लागवडीतून मिळेल भरघोस उत्पन्न

गेल्या काही दिवसांमध्ये शेतकऱ्यांचा वांग्याच्या लागवडीकडे ओढा वाढला आहे. गुणवत्तापूर्ण वांग्याला हॉटेल, मॉल, तसेच दैनंदिन आठवडे बाजारात मोठी मागणी देखील असते. विशेष म्हणजे वांग्याचे पीक हे बारमाही घेतले जाणारे पीक आहे. अशातच आता अवघ्या काही दिवसांमध्ये खरीप हंगाम सुरु होणार असून, वांग्याच्या रोपांसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरु झाली आहे.

बियाणे आणि खते : शेतकऱ्यांना वांग्याच्या लागवडीसाठी अधिकृतपणे बियाणे खरेदी करायचे असल्यास शेतकरी राष्ट्रीय बियाणे महामंडळाच्या (एनएससी) संकेतस्थळावरून थेट बियाणे मागवू शकतात. एनएससीच्या संकेतस्थळावर शेतकरी सर्व प्रकारच्या फळे आणि भाजीपाल्याचे बियाणे थेट घरपोच मागवू शकतात. याच पार्श्वभूमीवर आपण वांग्याच्या ९९२२ प्रजाती, पूसा हिरवी प्रजाती आणि कुकू प्रजाती या तीन प्रजातीच्या वांग्याची वैशिष्ट्ये आहेत.



९९२२ प्रजाती : ९९२२ ही वांग्याची हायब्रीड प्रजाती असून, तिचा रंग काळसर आकार गोल किंवा आयताकार असतो. या वांग्याची लांबी जवळपास ८ ते १० सेमी इतकी असते. वांग्याचे हे वाण खरीप आणि रब्बी अशा दोन्ही हंगामात लागवड केले जाऊ शकते. या वाणाची लागवड ही देशातील सर्वच राज्यांमध्ये केली जाऊ शकते. एनएससीने ९९२२ प्रजातीच्या वांग्याचे १० ग्रॅम बियाण्याचे पॅकेट हे ४२ रुपये इतक्या नाममात्र किमतीत उपलब्ध करून दिले आहे.

पुसा हिरवी वांगी : पुसाच्या हिरव्या प्रजातीचे वांगे हे आकारात गोल असते. या वांग्याची लागवड मैदानी भागात केली जाते. या वाणाचे वांग्याचे पीक किमान ५५ ते ६० दिवसांमध्ये तोडणीला येते. पुसाच्या हिरव्या प्रजातीचे वांग्याचे २५ ग्रॅम बियाण्याचे पॅकेट, शेतकऱ्यांना एनएससीने केवळ २० रुपये इतक्या नाममात्र दरात उपलब्ध करून दिले आहे.कुकू प्रजाती : वांग्याची कुकू प्रजाती ही खरीप हंगामासाठी वापरली जाणारी विशेष प्रजाती आहे. या प्रजातीचे वांगे १०० ते ११० दिवसांत तोडणीला येते. या वाणाच्या लागवडीपासून शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ३०० क्विंटल उत्पादन मिळते. कुकू प्रजातीचे १० ग्रॅम बियाणे हे एनएससीच्या संकेतस्थळावर, शेतकऱ्यांसाठी केवळ ४६ रुपयांना उपलब्ध आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८३० : आजच्याच दिवशी थोर समाजसुधारक राजा राममोहन रॉय यांनी इंग्लंड या देशाला प्रयाण केले होते.
१९४५: व्हेनेझुएलाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९४९ : महात्मा गांधींच्या हत्येसाठी नथुराम गोडसे व नारायण आपटे यांना फाशी.
१९६१ : संयुक्त राष्ट्र या आंतरराष्ट्रीय संघटनेने आजच्याच दिवशी परमाणु हत्यारावर बंदी आणली होती.
१९७१ : इंटेल कंपनी ने जगातील पहिले व्यावसायिक मायक्रोप्रोसेसर चीप ४००४ प्रकाशित केले.
१९८९ : सचिन तेंडुलकरने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधे पदार्पण केले.
१९९६ : भारतीय शास्त्रज्ञ डॉ. त्रिलोकीनाथ खुशू यांना संयुक्त राष्ट्रांतर्फे दिला जाणारा 'सासाकावा पर्यावरण पुरस्कार' जाहीर. पर्यावरणाचे रक्षण आणि नियोजन या क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांची या पुरस्कारासाठी निवड झाली.
१९९९ : रेवदंडा येथील निरुपणकार नानासाहेब धर्माधिकारी यांना हजारो समर्थभक्तांच्या साक्षीने प्रा. शिवाजीराव भोसले यांच्या हस्ते 'शिवसनर्थ पुरस्कार' प्रदान
२००० : देशाचे अठ्ठाविसावे राज्य म्हणून झारखंड हे राज्य अस्तित्त्वात आले. राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून भाजपचे बाबूलाल मरांडी यांनी शपथ घेतली.
२००० : फिजी या देशात अकाली शासन बदल करणे अवैध घोषित करण्यात आले.
२००४ : अमेरिकेचे पूर्व विदेश मंत्री कॉलीन पॉवेल यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.
२००७ : चिली या देशात ७.७ इतक्या तीव्रतेचा भूकंप झाला.
२००८ : योगेंद्र मक़बाल यांनी राष्ट्रीय बहुजन काँग्रेस या पक्षाची स्थापना केली.
२०१२ : शी जिनपिंग आजच्याच दिवशी चीनच्या कम्युनिस्ट पक्षाचे महासचिव बनले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७३८ : विल्यम हर्षेल - जर्मन/ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ व संगीतकार. १७३८ मधे त्याने युरेनस ग्रहाचा शोध लावला. (मृत्यू: २५ ऑगस्ट १८२२)
१८६६ : भारताची प्रथम महिला बैरिस्टर कार्नेलीया सोराबजी यांचा जन्म.
१८७५ : बिरसा मुंडा - झारखंडमधील आदिवासी स्वातंत्र्यसैनिक (मृत्यू: १९००)
१८८५ : गिजुभाई बधेका - आधुनिक बालशिक्षणाच्या क्षेत्रातील आद्य कार्यकर्ते (मृत्यू: २३ जून १९३९ भावनगर, गुजराथ)
१८९१ : एर्विन रोमेल - जर्मन सेनापती (मृत्यू: १४ आक्टोबर १९४४)
१९०८ : अबार्थ कंपनी चे संस्थापक कार्लो अबार्थ यांचा जन्म. (मृत्यू: १९७९)
१९१७ : दत्तात्रेय शंकर तथा दत्ता डावजेकर - संगीतकार (मृत्यू: २००७)
१९१४ : भारतीय वकील आणि न्यायाधीशव्ही. आर. कृष्णा अय्यर यांचा जन्म. (मृत्यू: ४ डिसेंबर २०१४)
१९२७ : उस्ताद युनुस हुसेन खाँ - आग्रा घराण्याच्या ११ व्या पिढीतील गायक (मृत्यू: २९ सप्टेंबर १९९१)
१९२९ : शिरीष पै - कवयित्री.
१९३६ : भारतीय-कॅनेडियन पत्रकार आणि प्रकाशक तारा सिंग हेर यांचा जन्म. (मृत्यू: १८ नोव्हेंबर १९९८)
१९४८ : सुहास शिरवळकर - कादंबरीकार आणि रहस्यकथालेखक (मृत्यू: ११ जुलै २००३)
१९८६ : अशोक चक्र सन्मानित भारतीय वायुसेनेतील शहीद गरुड कमांडो ज्योतीप्रकाश निराला यांचा जन्म.
१९८६ : सानिया मिर्झा - लॉन टेनिस खेळाडू.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६३० : योहान केपलर जर्मन गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ (जन्म: १५७१)
१९३७ : हिंदीचे प्रसिध्द साहित्यकार जयशंकर प्रसाद यांचे निधन.
१९३८ : पंजाब येथील प्रसिध्द आर्य समाजाचे नेता तसेच समाजसुधारक महात्मा हंसराज यांचे निधन.
१९४९ : नथुराम गोडसे - महात्मा गांधींच्या वधाच्या कटातील प्रमुख आरोपी (जन्म: १९ मे १९१०)
१९४९ : नारायण दत्तात्रय आपटे - महात्मा गांधींच्या वधाच्या कटातील एक आरोपी
१९६१ : कम्युनिस्ट नेते बंकिम मुखर्जी यांचे निधन झाले.
१९८२ : आचार्य विनोबा भावे - भूदान चळवळीचे प्रणेते, महात्मा गांधींचे पट्टशिष्य, भारतरत्न १९८३ मरणोत्तर, १९४० मध्ये महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाच्या केलेल्या आंदोलनात पहिला सत्याग्रही म्हणून विनोबांची निवड केली. भूदान यज्ञात विनोबांनी देशभर पदयात्रा केली. (जन्म: ११ सप्टेंबर १८९५)
१९९६ : डॉ. माधवराव सूर्याजी पवार - कृषीतज्ज्ञ, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू.
१९९६ : भारताचे प्रसिध्द कवी व कथाकार आर सी प्रसाद सिंह यांचे १९९६ साली निधन.
२०१२ : कृष्ण चंद्र पंत - केन्द्रीय मंत्री व नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष (जन्म: १९३१)
२०१३ : मथुरा येथील प्रसिध्द संत कृपालू जी महाराज अनंतात विलीन झाले.
२०१७ : हिंदी कवी कुवर नारायण यांचे निधन.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
शनिवार दि.१५ नोव्हेंबर २०२५





# धोकादायक वर्गखोलीत जीवघेणे शिक्षण, अंगणवाडी सुटेपर्यंत विद्यार्थी झाडाखाली

## सारोळा बद्दीशाळेच्या इमारतीला तडे, एकाच खोलीत दोन वर्ग

अहिल्यानगर । प्रतिनिधी

मुलभूत बदल घडवून आणण्यासाठी नवे शैक्षणिक धोरण आणले. परंतू, आजही अनेक शाळांत विद्यार्थ्यांना मुलभूत सुविधा मिळत नाहीत. अहिल्यानगर तालुक्यातील सारोळा बद्दी शाळेतील विद्यार्थ्यांना अंगणवाडी सुटेपर्यंत झाडाखाली बसावे लागते. मागील दोन वर्षात जिल्ह्यात ६४ खोल्या धोकादायक असल्याचे प्रस्ताव जिल्हा परिषदेला सादर झाले. परंतू, या मुद्द्याकडे दुर्लक्ष करून अवघ्या ९ खोल्या पाडण्यास मंजुरी मिळाली. अजूनही २२ शाळांमधील विद्यार्थी जीव मुठीत घेऊन शिक्षण घेत आहेत. शिक्षण खात्याच्या प्रशासकीय कारभाराच्या दिरंगाई विरोधात नागरिकांमध्ये संताप आहे.



किमान ४० वर्षे जुन्या शाळा खोल्या पाडल्या जातात. पण सारोळा बद्दी येथील शाळेचे बांधकाम २००४ मध्ये केले आहे. २० वर्षातच इमारतीला भेगा पडल्या, इमारत मोडकळीस आली आहे. पहिली ते सातवी पर्यंतचे ९५ विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेतात. इमारत धोकादायक असल्याने पहिली व तिसरीच्या मुलांना अंगणवाडी सुटेपर्यंत झाडाखाली बसावे लागते. त्यानंतर एकाच खोलीत हे दोन्ही वर्ग भरवले जातात. तर दुसरी व चौथीला झाडाखाली बसून शिक्षण घ्यावे लागते,अशी विदारक अवस्था आहे. शिक्षण विभागाकडून दरवर्षी धोकादायक वर्गखोल्यांमध्ये मुलांना न बसवता पर्यायी खोल्यांची व्यवस्था करण्याचे पत्र दिले जाते. परंतू, पर्यायी खोली किंवा जुनी खोली पाडण्याच्या प्रक्रियेला गती दिली जात नाही. जेथे खोल्या नाहीत, तेथे आवश्यकतेनुसार नवीन खोल्या मिळाल्या नाहीत.या खोल्या पाडण्यास दिली मंजुरी जिल्हाभरात २०२३ ते आजपर्यंत ९ खोल्या पाडण्यास मंजुरी दिली. त्यात अकोले तालुक्यातील निंब्रळ शाळेतील ४ खोल्या, नेवासे तालुक्यात शहापूर येथील ४ व अहिल्यानगर तालुक्यातील खोसपुरी येथील १ या खोल्या पाडण्यास मंजुरी आहे. उर्वरित ५४ प्रस्ताव त्रुटींमुळे माघारी पाठवण्यात आल्याची माहिती शिक्षण विभागाने दिली. पाडण्याची प्रक्रिया वेळखाऊ असल्याने विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊन शिक्षण घ्यावे लागत आहे.अहवाल देण्याचे आदेश आम्ही सारोळा बद्दीच्या शाळेसंदर्भात गटशिक्षणाधिकारी व उपअभियंत्यांना पाहणी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

मुख्याध्यापकांनाही प्रस्ताव सादर करण्यास सांगितले. शाळा निर्लेखन करताना शाळा केव्हा बांधली, धोकादायक ठरते किंवा नाही हे पाहिले जाते. तसेच निर्लेखन मंजुरीच्या प्रक्रियेला वेळ होत असल्याने, या प्रक्रियेला गती देऊ. – विजय मुळीक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. पत्राकडे दुर्लक्ष सारोळा बद्दी येथील शाळेतील भिंतीला तडे गेले. विद्यार्थी सुरक्षेसाठी खोल्या दुरूस्तीकडे मुख्याध्यापक गजानन जाधव यांनी गटशिक्षणाधिकाऱ्यांचे लक्ष जुलैमध्ये पत्राद्वारे वेधले होते. परंतू, ४ महिने उलटूनही दुरूस्ती झाली नाही. त्यामुळे विद्यार्थी झाडाखाली शिक्षण घेत आहेत.

# बद्रीनारायण बारवाले कॉलेजकडून विद्यार्थ्यांचे नुकसान



जालना । प्रतिनिधी

जालना येथे महिको रिसर्च ट्रस्ट संचालित बद्रीनारायण बारवाले या महाविद्यालयामध्ये प्रजक्त सुरेश पोहार ही विद्यार्थिनी परिक्षेला हजर असतानाही गैरहजर दाखविले. त्यामुळे सदरील मुलीचे नुकसान होण्याची शक्यता आहे, असे तिच्या पालकाकडून सांगण्यात आले आहे. शैक्षणिक नुकसान झाल्यास याला कॉलेज जबाबदार असेल, असा इशारा

प्रजक्त सुरेश पोहार ही विद्यार्थीनी बद्रीनारायण बारवाले कॉलेज मध्ये बीएच्या दुसऱ्या वर्गात शिकत आहे. तिने बीए च्या प्रथम वर्गाचा पेपर परीक्षा क्रमांक ०२७१०८ या क्रमांकाने दिला. तिला महाविद्यालयाने ३० पैकी २७ गुण दिले आहेत. मात्र विद्यापीठाच्या निकालात तिला गैरहजर दाखविले आहे. याबाबत पालकाने पोलिस ठाणे गाठले मात्र यावर काही मार्ग निघालेला नाही. मुलीचे नुकसान झाले तर याला कॉलेज जबाबदार असेल असे पालक म्हणत आहेत तर ही चूक विद्यापीठाची असल्याचे कॉलेज सांगत आहे.

याबाबत प्राचार्यांकडून उडवाउडवी केली जात असल्याचे पालकाचे म्हणणे आहे. संबंधित विद्यार्थीनी पुन्हा परीक्षा देण्यास नकार देत आहे. जर निकालात दुरुस्ती झाली नाही व वर्ष वाया गेले तर याची सर्वस्वी जबाबदारी कॉलेज व विद्यापीठाची राहील. या बाबीची नोंद घेऊन संबंधित विद्यार्थीनीचा सुधारीत निकाल जाहिर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# नोकरानेच दुकानातील २० लाखांचा मुद्देमाल पळविला

## कळमनुरी पोलिसात गुन्हा दाखल, फरार आरोपीचा शोध सुरू




हिंगोली । प्रतिनिधी

कळमनुरी शहरात दुकानातील नोकरानेच २० लाखांचा मुद्देमाल पळवल्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी कळमनुरी पोलिस ठाण्यात गुरुवारी ता. १३ गुन्हा दाखल झाला आहे. मात्र गुन्हा दाखल होताच नोकर फरार झाला असून पोलिसांनी त्याचा शोध सुरु केला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शाम उदावंत यांचे कळमनुरी येथील पोस्ट ऑफीस रोड भागात सोने चांदीचे दुकान आहे. या ठिकाणी सोने, चांदी विक्री सोबतच मोड देखील खरेदी केली केला जाते. व्यापारी शाम उदावंत यांना सतत बाहेरगावी जावे लागत असल्यामुळे त्यांनी सन २०२१ पासून दुकानात नदीम पठाण (रा. मसोड, ता. कळमनुरी) यास कामासाठी ठेवले होते. व्यापारी शाम यांच्या सततच्या प्रवासामुळे दुकानातील सर्व व्यवहार नदीम हाच पहात होता.

दरम्यान, नदीम याच्यावर विश्वास ठेऊन व्यापारी शाम यांनी कधीही हिशेब जुळवला नाही. मात्र मागील काही दिवसांत त्यांना शंका आल्यामुळे त्यांनी हिशेब तपासण्यास सुरवात केली. यामध्ये नदीम याने ता. १ सप्टेंबर २५ ते ता. २९ सप्टेंबर २५ या कालावधीतच दुकानातील हिशेब तपासणी केली असता त्यात १० लाख रुपयांची रक्कम व सुमारे १० लाख रुपये किंमतीचे मोड आलेले सोन्या चांदीचे दागिने कमी असल्याचे दिसून आले. या प्रकरणी व्यापारी शाम यांनी कळमनुरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यामध्ये नदीम पठाण याने १० लाख रुपये व मोडी मध्ये आलेले १० लाख रुपयांचे दागिने असा २० लाखांचा मुद्देमाल चोरून नेल्याचे नमुद केले. यावरून पोलिसांनी नदीम पठाण याच्या विरुध्द गुन्हा दाखल केला आहे. मात्र गुन्हा दाखल होताच नदीम फरार झाला असून पोलिस निरीक्षक प्रेमकुमार माकोडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक रघुनाथ शेवाळे, जमादार गजानन होळकर पुढील तपास करीत आहेत.

# वातावरणाने तुरीवर अळीचा प्रादुर्भाव; फवारणीचा खर्चही वाढल्याने अडचण

## सिल्लोड तालुक्यात परतीचा पाऊस लांबल्यामुळे कापूस वेचणीला अडचण

सिल्लोड । प्रतिनिधी

तालुक्यात टाकळी जिवरगसह कायगाव परिसरात सततच्या पावसामुळे कपाशी पिकाचे नुकसान झाले. अपेक्षित दर न मिळाल्याने कपाशी पिकाचा खर्चही निघत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची संपूर्ण भिस्त आता तूर पिकावर आहे. मात्र तुरीवरही अळी व रोगांचा प्रादुर्भाव झाला आहे. यामुळे ओल्या दुष्काळात शेतकऱ्यांच्या खिशावर जास्तीचा आर्थिक भार पडत आहे. परतीचा पाऊस लांबल्याने कापूस वेचणीला अडचणी येत आहेत. परिणामी शेताची मशागत करण्यात वेळ गेल्याने रब्बी पेरणी उशिराने होणार आहे. यामुळे रब्बी पिकांचे गणित कोलमडण्याची शक्यता आहे. यंदा कपाशीचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे.



आता त्यांची एकट्या तुरीच्या पिकावर आशा आहे. परतीच्या पावसामुळे शेतजमीन ओली झाल्याने रब्बी हंगामातील पेरणीसाठी कालावधी वाढला आहे.

शेतकऱ्यांनी तण काढण्यासाठी तणनाशक फवारणी केली आहे. तर काही ट्रॅक्टरच्या साह्याने रोटावेटर करत आहेत. रब्बी पेरणीचा कालावधी या महिन्यात शेवटच्या टप्प्यात असल्याने लागवड क्षेत्र अजून तयार झाले नाही, मात्र हरभरा आणि गहू पिकांचे क्षेत्र यंदा वाढण्याचा अंदाज कृषी विभागाकडून वर्तवला जात आहे. यंदा जलसाठ्यात भरमसाट पाणी उपलब्ध आहे. त्यामुळे उशिरा पेरणी करूनही रब्बी हंगाम चांगला होईल, अशी अपेक्षा परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे. ढगाळ वातावरणाने शेतकरी चिंतेत खरीप हंगामातील तुरीचे पीक सध्या फुलधारणेच्या अवस्थेत असून चांगल्या उत्पादनाची शेतकऱ्यांना आशा आहे, परंतु तूर पिकावर अळीचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकरी कीटकनाशकांची फवारणी करीत आहेत. सतत पाऊस हजेरी लावत असून, अधून-मधून सध्या ढगाळ वातावरण होत असल्याने शेतकरी धास्तावले आहेत.

# प्रेयसीच्या खूनप्रकरणी प्रियकरास सक्त मजुरी

धाराशिव । प्रतिनिधी

खुनाच्या गुन्ह्यात न्यायालयाने प्रियकर आरोपीस आरोपीस १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा व ४५ हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. हा निकाल अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती ए. डी. देव यांच्या न्यायालयात देण्यात आला.

या प्रकरणात आरोपी विष्णू लक्ष्मण लोंढे याचे गावातीलच मोहिनी चोपडे या महिलेशी ओळख झाली. त्यातूनच त्याने तिच्याकडे १० ऑगस्ट २०१७ रोजी शरीरसुखाची मागणी केली. त्यात तिने विरोध केल्यानंतर दोघांमध्ये वाद झाला होता. या झटापटीत आरोपी लोंढे याने मोहिनीच्या अंगावर रॉकेल टाकून पेटवून दिल्याने ती गंभीर भाजून मृत्युमुखी पडली. या घटनेनंतर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. संबंधित महिलेच्या पतीने पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यानंतर पोलिसांनी तपास पूर्ण करून आरोपपत्र दाखल केले. प्रकरणाची सुनावणी चालू असताना सरकारी पक्षातर्फे एकूण ११ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. सरकारी अभियोक्ता एम. बी. देशमुख यांनी सरकारी पक्षाचे काम पाहिले. त्यांनी न्यायालयात ठोस पुरावे सादर करून आर-ोपीचा दोष सिद्ध केला. न्यायालयाने आरोपीस १० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा व ४५,००० रुपयांचा दंड ठोठावला.

# बसमध्ये डिझेल भरताना आगारात नोजलचा स्फोट

हिंगोली । प्रतिनिधी

येथील राज्य परिवहन महामंडळाच्या आगारात डिझेल पंपावर बसमध्ये डिझेल भरताना अचानक नोजलचा स्फोट झाल्याची घटना गुरुवारी घडली. यात महिला कर्मचारी ज्योती काळे वय ३७ वर्ष गंभीर जखमी झाल्या. त्यांना उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी नांदेड येथे पाठविण्यात आले.

येथील राज्य परिवहन मंडळाच्या आगारात गुरुवारी एका बसमध्ये डिझेल भरत असताना डिझेल पंपाच्या नोजलमध्ये बिघाड होऊन त्याचा स्फोट झाला. यात ज्योती काळे यांच्या अंगावर डिझेल पडल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. त्यांना तातडीने एका बसमध्ये टाकून उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथे दाखल या घटनेनंतर करण्यात आले. आगारातील सुरक्षेबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे. डिझेल पंपाची अवस्था अत्यंत दयनीय असून पंपाच्या



नोजलला जाळे लागलेले स्पष्टपणे दिसत आहे. त्याचबरोबर बाजूला असलेल्या विजेच्या तारा चिकट टेप लावून जोडलेल्या अवस्थेत आहेत.

वाहनांना इंधन पुरवठा करणाऱ्या या पंपावर सुरक्षेचे कोणतेही नियम पाळले जात नसल्याची चर्चाचालक व कर्मचारी वर्गात चर्चा सुरू आहे. या प्रकरणी अधिक माहिती घेण्यासाठी आगारप्रमुखांशी संपर्क केला असता त्यांनी फोन घेतला नाही. अन्य कर्मचाऱ्यांकडून माहिती घेतली असता ते सुट्टीवर असल्याचे सांगण्यात आले.

# कर्ज मंजुरीचे आमिष दाखवून विवाहितेवर अत्याचार; पीएनबी बँकेच्या मॅनेजरवर गुन्हा

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत कर्ज मिळवून देण्याचे आमिष दाखवून विवाहित महिलेला जाळ्यात ओढत तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पंजाब नॅशनल बँकेच्या सिडको शाखेतील मॅनेजर दीपक महादू येळणे (३७, रा. संस्कृत व्हिला अपार्टमेंट, जवाहर कॉलनी) याच्याविर-ोधात न्यायालयाच्या आदेशाने दौलताबाद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार ८ ऑगस्ट ते ६ ऑक्टोबर २०२४ दरम्यान घडल्याचे समोर आले आहे.

फिर्यादी २५ वर्षीय विवाहित महिला असून, त्या घरीच ब्युटीपार्लर चालवतात. कुटुंबाच्या आर्थिक स्थितीला हातभार लावण्यासाठी त्यांनी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत १० लाख रुपयांच्या कर्जासाठी जिल्हा उद्योग केंद्रात अर्ज केला होता. मंजुरीनंतर फाईल पंजाब नॅशनल बँकेच्या



सिडको शाखेत पाठवली. सुरुवातीला त्यांना कर्ज मिळाले नाही.

नंतर आरोपी दीपक येळणे मॅनेजर म्हणून रुजू झाला. त्याने कर्ज मंजुरीचे आमिष दाखवून पीडितेचा व्हॉट्सअॅप नंबर घेतला आणि संवाद सुरू केला. ८ ऑगस्ट २०२४ रोजी त्याने पीडितेला सिडको बसस्थानकाजवळील हॉटेलवर बोलावून कर्ज मंजूर होईपर्यंत माझ्याकडून पैसे घे, नंतर परत कर, असे सांगितले. त्यानंतर समर्थनगर येथील लॉजवर नेऊन जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर त्याने पीडितेच्या खात्यात एक लाख रुपये ट्रान्स्फर केले. पुढे सप्टेंबरमध्ये चिकलठाणा येथील लॉजवर पुन्हा अत्याचार करून ९० हजार रुपये ट्रान्स्फर केले. ऑक्टोबरमध्ये आरोपीने कर्ज मंजूर झाले, असा खोटा बहाणा करून पीडितेला दौलताबाद येथील एका फार्महाऊसवर नेले. तेथेही अत्याचार केला.

संशय आल्याने पीडितेने ओळ-खीच्या व्यक्तीला फोन करून माहिती दिली आणि त्या ठिकाणी आरोपी रंगेहात पकडला गेला. चौकशीत कर्ज मंजूरच नसल्याचे उघड झाले. बलात्कार प्रकरणातून सुटका मिळवण्यासाठी येळणे यांनी उलट १५ ऑक्टोबर २०२४ रोजी जवाहरनगर पोलिस ठाण्यात पीडितेविरुद्ध खोटा खंडणीचा गुन्हा दाखल केला, असेही फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी दौलताबाद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून, पुढील तपास पीएसआय वसंत शेळके करत आहेत.

# सराईत गुन्हेगारांची टोळी पिस्तूल, चाकूसह जेरबंद



छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

नशेचे सिरप विक्रीसाठी आलेल्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीला सिटी चौक पोलिसांनी बेड्या ठोकल्या. तिघांकडून गावठी पिस्तूल, दोन जिवंत काडतुसे, दोन चाकू, सिरपच्या १६ बाटल्या असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई फाजलपुरा भागात करण्यात आली.

इरफान ऊर्फ दानिश अयुब खान (२४, रा. बायजीप-रा), शेख शाहरुख शेख इरफान (२८, रा. हसूल) आणि शेख एजाज इब्राहिम (३५, रा. नारेगाव) अशी अटकेतील आरोपींची नावे असल्याची माहिती पोलिस निरीक्षक निर्मला परदेशी यांनी दिली. सिटी चौक ठाण्याचे उपनिरीक्षक विठ्ठल शिंदे हे पथकासह गस्तीवर असताना त्यांना फाजलपुरा भागात एक जण नशेचे सिरप विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यांनी पथकासह चांदणे चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील हॉटेल मेट्रोकडे धाव घेत मोपेडवर आलेल्या तिन्ही आरोपीना पकडले. अंगझडतीत दानिशच्या कमरेला गावठी पिस्तूल, दोन जिवंत काडतुसे, खाली केस, अन्य आरोपींकडे दोन चाकू, १६ सिरपच्या बाटल्या आढळून आल्या. तिघांना अटक करून सिटी चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दिवसा घरफोडी करणारा अट्टल गुन्हेगार पोलिसांच्या जाळ्यात

## पाच गुन्हे उघडकीस; स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी





**बीड | प्रतिनिधी**

पोलीस अधीक्षकांनी बीड जिल्हयातील चोरी, घरफोडी, दरोडे आदी विरुध्दचे गुन्हे उघडकीस आनने बाबत स्थानिक गुन्हे शाखेला आदेशीत केले होते. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे विवीध पथकाने त्या दृष्टीकोणातुन वेगवेगळ्या घरफोडी करणाऱ्या आरोपींची माहीती घेवुन गुप्त बातमीदार नियुक्त केले होते. दिवसा घरफोडी करणारा संदीप भोसले हा गेवराई तालुक्यातील उमापूर फाट्यावर पार्सल नेण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळतात आणि गुन्हे शाखेच्या पोलिसांनी या ठिकाणी छापा मारून त्याला ताब्यात घेतले मात्र त्याचा साथीदार पळून गेला.

दिनांक १२ नोव्हेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्तबातमीदारा मार्फत माहीती मिळाली की, पोलीस ठाणे गेवराई गुर.नं ४८२/२०२५ कलम १०९(१) ईतर बी. एन. एस व सह कलम ३/२५ आर्म अ‍ॅक्ट मधील गुन्हा करुन मागील चार महीण्यापासुन मिळुन येत नसलेला आरोपी नामे संदीप ईश्वर भोसले रा बेलगांव ता कर्जत जि अहिल्यानगर हा गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन फाटा येथील हॉटेलवर जेवणाचे पार्सल घेण्यासाठी येणार आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्यावरुन पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी तात्काळ पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर यांची टिम रवाना केली. नमुद बातमीचे ठिकाणी स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी सदरील ठिकाणी सापळा लावला व तेथे संदीप ईश्वर भोसले हा जेवणाचे पार्सल घेण्यासाठी आला असता त्याला पोलीस आल्याचा संशय आल्याने तो पळण्याचे तयारीत असताना तेथे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी झडप मारुन जागीच पकडले परंतु त्याला मोटार सायकल वर घेवुन आलेला दुसरा आरोपी भगवान ईश्वर भोसले हा शेतामध्ये उसाचा आसरा घेवुन पळून गेला.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने आरोपी संदीप ईश्वर भोसले रा बेलगांव ता कर्जत जि अहिल्यानगर यास ताब्यात घेवुन त्याचे कडे बीड जिल्हयातील केलेल्या घरफोडी बाबत चौकशी केली असता त्याने बीड जिल्हामध्ये विवीध ठिकाणी पोलीस ठाणे पिंपळनेर, अंमळनेर, नेकपुर व शिरुर भागात संदीप याचा भाऊ भगवान ईश्वर भोसले याचे मदतीने चोऱ्या केल्याचे कबुली दिली आहे. आरोपी संदीप ईश्वर भोसले कडुन खालील पोलीस ठाणेचे दिवसा घरफोडी केल्याचे गुन्हे उघडकीस आनले आहेत. त्याचे कडुन चोरुन नेलेल्या मुद्देमालापैकी एकुण ४,४१,१०० रु सोने व चांदीचे दागीणे व नगदी व गुन्हयात वापरलेली मोटार सायकल ९०,०००/- रु असा एकुण ५,३१,०००/- रु किमतीचा मुद्येमाल हस्तगत करण्यात आले आहे. आरोपी व मुद्देमाल पुढील तपासकामी पोलीस ठाणे पिंपळनेर याचे ताब्यात देण्यात आले आहे. या आरोपी विरुद्ध १. पोलीस ठाणे पिंपळनेर गु.र.नं २२३/२०२५ कलम ३३१(३), ३०५ बी.एन.एस २. पोलीस ठाणे पिंपळनेर गु.र.नं २२६/२०२५ कलम ३३१(३), ३०५ बी.एन.एस ३. पोलीस ठाणे अंमळनेर गु.र. नं १४८/२०२५ कलम ३३१ (३), ३०५ बी.एन.एस,४. पोलीस ठाणे नेकणुर ◀◀ पान ३ वर

# अनिता ठाकूर यांना ऐ.डी.फाउंडेशनचा महाराष्ट्र नारिशक्ती समाजरत्न पुरस्कार


अंबाजोगाई | प्रतिनिधी



अनुश्री धनश्री फाउंडेशन सांगली, यांच्या वतीने दरवर्षी समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान केला जातो.अनिता ठाकूर या स्वातंत्र्य सेनानी संग्रामसिंग चौहान यांच्या नातं व वामनराव ठाकूर यांच्या स्नुषा आहेत. त्यांना माहेरी, सासरी या दोन्हीकडे समाज कार्याचे बाळकडू मिळाले. त्यांनी ज्ञानप्रबोधिनी येथे प्रसाद चिक्षे,अभिजित जोंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली बालवाडी शिक्षिका म्हणून काम केले. त्या नंतर विमल मुंदडा यांच्या पारिवारिक संबंध तात आल्या त्या कालावधीत त्यांनी तहसिल अंतर्गत दक्षता समिती,स्वा.रा.ती. रुग्णालय अभ्यागत मंडळ,भ्रष्टाचार समिती अशा अनेक शासकीय, निमशासकीय समितीवर कार्य केले. तसेच स्वातंत्र्य सैनिक वसाहतीमध्ये विविध महिलांना एकत्र करून बचत गटाची स्थापना केली व त्या माध्यमातून महिलांना स्वबळावर उभे राहण्याची प्रेरणा मिळाली.आधारकार्ड, मतदानकार्ड,आयुष्मान भारत कार्ड इ.तात्काळ उपलब्ध होण्यासाठी अधिकारी,कर्मचारी यांच्याशी संपर्क साधून ते उपलब्ध करून दिले. वसाहतीतील रहिवासी यांचे वाढदिवस अनाथाश्रम, अंधमूकबधिर शाळा आदी ठिकाणी साजरे करतात व ते साजरे करताना कपडे, ◀◀ पान ३ वर

# सांगवी पाटण गावात चोरी; दीड तोळे सोने व २० हजार रुपये लुटले

आष्टी | प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण गावात भगवान देवराव भोसले यांच्या घरी रात्री सुमारे ११ ते १२ वाजता चोरी झाल्याचा प्रसंग घडला आहे. घरातील सर्व माणसे रात्री गावामध्ये भैरवनाथ जन्माष्टमी निमित्त कीर्तनाला गेले असता संधी चे सोन करत अज्ञात चोरांनी त्यांच्या घरातून दीड तोळे सोने आणि २० हजार रुपयांची रोख रक्कम लुटली असल्याचे समजून येत आहे.

ही बातमी लगेचच गावभर पसरली आणि घटनास्थळी पोलीस कॉन्स्टेबल सव्वाशे साहेब, सरपंच दत्तात्रय खोटे, उपसरपंच राहुल खिलारे, पांडुरंग भोसले,राजू भोसले, महेश भगत, समाजसेवक समीर शेख व ग्रामस्थ मदतीसाठी धावून आले. सध्या स्थानिक पोलिस ठाण्यात या घटनेची तक्रार नोंदवण्यात आलेली असून, चोरीच्या घटनेच्या कारणांची चौकशी सुरू आहे.चोरांनी चोरी केलेलल्या ठिकाणी कोणता मोबाईल नंबर आला होता याचा शोध पोलिसांनी लावावा त्यामुळे चोर लवकर पकडला जाईल समाजसेवक समीर शेख

या प्रसंगाने गावातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांकडून गावात जनजागृती करण्यात आली असून, गावातील ग्रामस्थ यांना संध्याकाळी व रात्री सावधगिरी बाळगण्याचा सल्ला ए.पी.आय नरवडे साहेब यांनी ग्रामस्थाना दिला आहे. सर्व ग्रामस्थांनी घराच्या कुलूपबंदोबस्तावर विशेष लक्ष द्यावे आणि कोणताही संशयास्पद व्यक्ती किंवा घटना दिसल्यास ताबडतोब पोलिसांना कळवावे, अशी विनंती करण्यात आली आहे.

# निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे -जिल्हाधिकारी

**बीड | प्रतिनिधी**



राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र शासन यांनी राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतीमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम- २०२५ दिनांक ०४.११.२०२५ रोजी घोषित केला असून बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई या नगरपरिषदा सार्वत्रिक निवडणूका कार्यक्रमात समाविष्ट आहेत. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहीता अंमलात आलेली आहे. त्यानुसार बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई या नगरपरिषदाच्या निवडणूका शांततेत व खुल्या वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली दि.४ नोव्हेंबर ला निवडणूक निर्णय अधिकारी व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांची बैठक घेऊन मार्गदर्शन केलेले आहे.

त्याचप्रमाणे बीड जिल्ह्यातील सर्व विभागप्रमुख व कार्यालय प्रमुख यांची बैठक दि. ५ नोव्हेंबर २०२५ रोजी आयोजित करण्यात येऊन सदर बैठकीत आदर्श आचार संहितेचे पालन करणे व प्रभावीपणे अंमलबजावणी करणे बाबत तसेच कायदा व सुव्यवस्थेचे पालन करणे बाबत आवश्यक त्या सूचना दिलेल्या आहेत.

बीड जिल्ह्यातील बीड, गेवराई, माजलगाव, धारुर, परळी, अंबाजोगाई या नगरपरिदांच्या सार्वत्रिक निवडणुका शांततेत व खुल्या वातावरणात पार पाडण्यासाठी खालील मुद्यांच्या अनुषंगाने आदेश पारीत करण्यात आलेले आहेत.

शासकीय/निमशासकीय कार्यालये/विश्रामगृहे इ. परिसरात मिरवणुका काढणे, घोषणा देणे व सभा घेणे इ. बाबींबाबत निर्बंध, सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंधक कायद्याअंतर्गत कार्यवाही करणे.उमेदवारांचे नामनिर्देशन दाखल करतेवेळी अवलंब करण्याची कार्यपद्धती. नमुना ◀◀ पान ३ वर

# यशस्वी होण्यासाठी जिद्द महत्त्वाची -रणवीर पंडित

## शिवाजीनगर बी.फार्मसी महाविद्यालयात फ्रेशर्स दिन आनंदात साजरा

**गेवराई | प्रतिनिधी**



कोणत्याही क्षेत्रात यश संपादन करण्यासाठी जिद्द महत्त्वाची आहे, मनात जिद्द ठेऊन वाटचाल केली तर यश आपल्याकडे येते, तेव्हा विद्यार्थ्यांनी जिद्द ठेऊन वाटचाल करावी व यशस्वी व्हावे असे आवाहन शारदा स्पोर्ट्स अ‍ॅकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. शिवाजीनगर गढी येथील कॉलेज ऑफ बी. फार्मसी अँड रिसर्च सेंटर येथे विद्यार्थ्यांकरिता फ्रेशर्स दिन आयोजित करण्यात आला होता, यांवेळी ते बोलत होते.

जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाचे कॉलेज ऑफ बी. फार्मसी अँड रिसर्च सेंटर, शिवाजी नगर, गढी. येथे प्रथम वर्ष विद्यार्थ्यांकरिता द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी फ्रेशर्स दिनाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला शारदा स्पोर्ट्स अ‍ॅकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, बाजार समितीचे उपसभापती श्रीराम पवार, शिवशारदा पब्लिक स्कूलचे प्राचार्य संतोष कुमार अन्नम. यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना रणवीर पंडित म्हणाले की, विद्यार्थ्यांनी वर्तमान काळातील शिक्षण क्षेत्रात असलेल्या स्पर्धेचा आणि त्याकरता आवश्यक असलेली जिद्द आत्मसात करून सामोरे जावे, तसेच आज दैनंदिन शिक्षणासह उत्तम आरोग्यासाठी खेळातही ◀◀ पान ३ वर

# जन्म-मृत्यू विलंब नोंदणीतील अडवणूक थांबवण्याची पाटोदा वकील संघाची मागणी

पाटोदा | प्रतिनिधी



जन्ममृत्यू नोंदणीतील विलंब आदेशाची प्रक्रिया न्यायालयाकडून महसूल विभागाकडे गेल्यापासून नागरिकांच्या अडचणीत प्रचंड वाढ झाली आहे. तहसील कार्यालयांत तांत्रिक मनुष्यबळाचा पूर्ण अभाव, कायदेशीर प्रशिक्षण नसलेले कर्मचारी आणि आधीच प्रचंड कामाचा बोजाया सगळ्या कारणांमुळे प्रकरणे महिनोन्?महिने रखडत आहेत. त्यामुळे जन्ममृत्यू प्रमाणपत्रांसारख्या मूलभूत दस्तऐवजांसाठी नागरिकांना वारंवार तहसील कार्यालयाचे खेटे मारावे लागत आहेत त्यामुळे नागरिकांची प्रचंड अडवणूक होत संदर्भातीलतील अडवणूक थांबवून ही प्रक्रिया सुलभ करावी अशी मागणी पाटोदा वकील संघाच्या वतीने शुक्रवार रोजी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे करण्यात आली

निवेदन देताना पाटोदा वकील संघाचे अध्यक्ष अ‍ॅड. बी.आर. लवुळ, उपाध्यक्ष अ‍ॅड. जब्बार पठाण, सचिव एडवोकेट विलास पवार कोषाध्यक्ष अ‍ॅड. विशाल मस्के, अ‍ॅड. जगदाळे, अ‍ॅड. सचिन जावळे, अ‍ॅड. अमरीश वैद्य, चंदन कांकरिया, अ‍ॅड. महेश बेद्रे, अ‍ॅड. पुनम शहाणे, अ‍ॅड. एस.बी. थोरवे, अ‍ॅड. तळेकर, अ‍ॅड. तुषार जाधव आदी सदस्य उपस्थित होते.




**आष्टी येथे कार्यक्रमानिमित्त महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आले असता त्यांचे हेलिपॅडवर त्यांचे स्वागत केले.यावेळी आष्टी, पाटोदा, शिरूर मतदार संघाचे आमदार सुरेश धस ,महात्मा फुले युवा दल तालुकाप्रमुख गणेश मोहळकर, दत्ता बोडके, गोवर्धन शेलार आदी उपस्थित होते.**

# भुरेवाडी-मातावळीत बिबट्याचा हैदोस

## दोन शेळ्या केल्या फस्त, नागरिकांमध्ये दहशत

बीड | प्रतिनिधी




पाटोदा तालुक्यातील भुरेवाडी व मातावळी येथे शुक्रवारी दुपारी बिबट्याने हैदोस घातला, दिवसात दोन शेळ्या फस्त केल्या. या प्रकारानंतर परिसरात दहशत पसरली असून शेतात जायलाही शेतकरी घाबरत आहेत. दरम्यान या प्रकरणी वन विभागाला कळवल्यानंतर त्यांनी संबंधित शेतकऱ्यांना कार्यालयात बोलावून कागदपत्रे ऑनलाईन करून त्यानंतर पंचानामा होईल असे सांगितले.आज या ठिकाणचे पंचनामे होतील असे सांगण्यात आले.

गेल्या काही दिवसापासून नागरी भागात बिबट्याचा वावर वाढला असून पाटोदा तालुक्यातील भुरेवाडी येथे शुक्रवारी दुपारी तीन च्या सुमारास बिबट्याने शेळी फस्त केली सौताड्या पासून पाच किलोमीटर आंतर असलेल्या या गावांमध्ये बिबट्याचा हल्ला झाल्यानंतर परिसरात दहशत पसरली आहे. याचबरोबर ◀◀ पान ३ वर

### ऑनलाईन नंतरच पंचानामे

हिंश्र पशुने पाळीव प्राण्यावर हल्ला केल्यानंतर या पाळीव प्राण्यांच्या मालकाने आधार कार्ड, फोटो, सातबारा, आठ -अ एअर टॅग प्रमाणपत्र अदी कागदपत्रे ऑनलाईन केल्यानंतरच या विभागाकडून पशु चिकित्सकांना पत्र दिले जाते आणि त्यांचे पीएम झाल्यानंतरच याचा पंचनामा होतो अशी माहिती वनाधिकारी शेळके यांनी दिली.

### आ.धस यांच्या फोन नंतरच हालचाली सुरू

भोरेवाडी येथे बिबट्याने शेळीवर हल्ला केल्यानंतर आणि यात शेळीचा प्राण गेल्यानंतर येथील शेतकरी बाबासाहेब शेंबडे यांनी संबंधितांना कळवले. मात्र त्याची दखल घेण्यात आली नाही. त्यानंतर नागरिकांनी आमदार सुरेश धस यांना कळवल्यानंतर त्यांनी वरिष्ठांना कळवून याचे पंचनामे तात्काळ करा अशा आदेश दिल्यानंतरच पुढच्या कारवाईला सुरुवात झाली. प्रत्येक गोष्टीलाच आमदारांना सांगण्याची वेळ येत असेल तर सामान्य नागरिकांनी नेमके काय करायचे असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान यशस्वी करून सरपंचांनी ग्रामसमृद्धी करावी -ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार गोरे



## सरपंचाचा प्रतिनिधी विधान परिषदेत असावा -आ.धस

आष्टी | प्रतिनिधी

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ही महत्त्वाकांक्षी योजना आहे. ग्रामविकासासाठी अत्यंत उपयुक्त असणारी ही योजना यशस्वी करण्यासाठी सरपंचांनी मोठी भूमिका बजावावी केवळ शासकीय अधिकाऱ्यांवर अवलंबून न राहता सरपंचांनी ग्रामस्थांना बरोबर घेऊन ही योजना राबवल्यास महाराष्ट्रातील सर्व गावे ग्रामसमृद्ध होतील असे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास मंत्री ना.जयकुमार गोरे यांनी केले.

तर सरपंच हा ग्रामीण विकासाचा कणा असून शिक्षक पदवीधर स्थानिक स्वराज्य संस्था आणि विधानसभा सदस्यातून देखील विधान परिषद सदस्य निवडले जातात त्याचप्रमाणे राज्यातील सर्व सरपंचांमधून एक आमदार निवडला जावा अशी मागणी आ.सुरेश धस यांनी केली.

आष्टी येथील सरपंचपदी परिषदेचे प्रदेशाध्यक्ष पत्रकार दत्ता काकडे यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर खा.बजरंग सोनवणे,आ. श्रीकांत भारतीय,माजी आ. भीमराव धोंडे,यशदाचे उपमहासंचालक डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी, जयदत्त धस, वसंत मुंडे, संतोष मानूरकर,सतीषआबा शिंदे,डा. शिवाजी ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बारामती नगराध्यक्षपद खुल्या प्रवर्गात ; अजित पवार गटात इच्छुकांची मांदियाळी, कोण मिळवेल ताज ?



बारामती । प्रतिनिधी

बारामती नगर परिषद नगराध्यक्ष पदासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुलाखती घेतल्या मात्र त्यानंतर आयोजित मेळाव्यात कोणाचेही नाव जाहीर केले नाही त्यामुळे नगराध्यक्ष पदाचा सस्पेन्स कायम राहिला . लवकरच नाव जाहीर करू असे अजित पवार यांनी स्पष्ट केले. अंतर्गत बंडाळी टाळण्यासाठी अजित पवार यांनी नाव जाहीर केले नाही अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली.

शहरातील राष्ट्रवादी भवन येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादीकडून बारामती नगरपरिषद माळेगाव नगरपंचायत निवडणुकीत नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. त्यानंतर आयोजित मेळाव्यात अजित पवार बोलत होते. यापूर्वी आयोजित पत्रकार परिषदेत आपण गुरुवारच्या मुलाखतीनंतर नाव जाहीर करणार असल्याचे पवार यांनी स्पष्ट केले होते.त्यामुळे बारामती नगरपरिषदेचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार ठरणार, अशी शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात होती. मात्र, मुलाखतीनंतर पवार यांनी कोणाचीही नाव नगराध्यक्ष पदासाठी जाहीर केले नाही. दोन-तीन दिवसांत नाव जाहीर केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. उमेदवार कोणीही असला तरी अजित पवार यांची राष्ट्रवादी व घड्याळ डोळ्यासमोर ठेवून कामाला लागण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी कार्यकर्त्यांना दिल्या.


गट, तट, भावकी अंतर्गत हेवेदावे बाजूला ठेवा. एकादिलाने सर्वजण एकत्र येऊन काम करा. नगराध्यक्ष पदाचा चेहरा सर्व समावेश असेल. गेली ३५ वर्षे आपण राजकारणात आहोत त्यामुळे कोणता नगराध्यक्ष द्यायचा हे मला चांगलंच कळतं असे अजित पवार यावेळी म्हणाले.बारामती नगरपरिषद तसेच माळेगाव नगरपंचायत नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी इच्छुक उमेदवारांनी आज राष्ट्रवादी भवन येथे मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

अजित पवार यांनी बारामती नगर परिषदेच्या वीस प्रभागातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. माळेगाव नगरपंचायतीच्या सत्र प्रभागातील इच्छुकांच्या देखील त्यांनी मुलाखती घेतल्या. सर्वांना संधी देणे शक्य नाही. मुलाखती दरम्यान आलेले अनुभव त्यांनी मेळाव्यात सांगितले. बारामती नगर परिषद नगराध्यक्षपदासाठी इच्छुक उमेदवारांना त्यांनी बारामती शहरासाठी तुमचे व्हिजन काय, गेल्या दहा वर्षात बारामती नगर परिषदेच्या माध्यमातून किती विकासकामे झाली, बारामती नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांची संख्या, अशा प्रश्नांची सरबत्ती केली. यावेळी बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गेल्या दहा वर्षात बारामती शहरातील विकासकामांचा आढावा घेतला. बारामती नगर परिषदेचे उत्पन्न ३२५ कोटी रुपये एवढे जमा झाले. मात्र शहरात ३ हजार ३०० कोटी रुपयांची विकास कामे झाले आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी विकास कामांना मिळवून दिल्याचे अजित पवार यांनी स्पष्ट केले. माळेगाव नगरपंचायतीसाठी देखील गेल्या पाच वर्षात जवळपास ३५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असल्याचे अजित पवार यांनी यावेळी स्पष्ट केले. माळेगावची नगरपंचायत आपल्या ताब्यात दिल्यास रोड मॉडेल अशी माळेगाव नगरपंचायत बनवून दाखवतो असेही अजित पवार यावेळी म्हणाले. माळेगावच्या गट, तट गावठी भावकीवर देखील अजित पवार बोलले.

## शिरूरमध्ये बिबट्याचा हौदोस; शेतकऱ्यावर हल्ल्याचा प्रयत्न, पत्नीच्या आरडाओरडीनं वाचला जीव

शिरूर । प्रतिनिधी

शिरूरच्या बेट भागात मागील महिनाभरात बिबट्याने हौदोस माजवला आहे. जांबूत आणि पिंपरखेड परिसरात बिबट्याच्या हल्ल्यात महिनाभरात तीन जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. या हल्ल्यांपैकी दोन हल्ले हे दिवसाढवळ्या झाल्याने नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली असून शिरूर, आंबेगाव, जुन्नर, खेड तालुक्यासह जवळपास राज्यातील अनेक भागात बिबट्याच्या भीतीचे सावट निर्माण झाले आहे.



मागील पंधरा दिवसांपूर्वी जांबूत (ता. शिरूर) येथील एका पतसंस्थेमध्ये कार्यरत असलेले दोन कर्मचारी वसुली करण्यासाठी बाहेर पडले असता त्यांचेवर बिबट्याने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याने कर्मचारी वर्गात घबराट निर्माण झाली आहे.

दरम्यान, बिबट प्रवण क्षेत्रातील बँका, पतसंस्थांसह इतर सहकारी संस्था व खाजगी शाळांच्या वेळेत बदल करण्याची मागणी कर्मचारी वर्गातून होत आहे. सकाळी दहा ते पाच या वेळेत सर्व दैनदिन कामकाज झाल्यास दूरवरून येणारे विद्यार्थी, अधिकारी ,कर्मचारी व शिक्षक आदींना वेळेवर घरी येणे सोयीचे ठरणार असून ज्या ज्या कार्यालयांच्या वेळा या उशिरापर्यंत आहेत. त्या त्या कार्यालय, बँकांनी आपल्या वेळेत बदल करण्याची मागणी होत असून बिबट समस्यांच्या पार्श्वभूमीवर काही कालावधीसाठी हे बदल होणे गरजेचे असल्याचे बोलले जात आहे.

शासनाच्या आदेशानुसार वनविभाग मात्र ॲक्शन मोडवर आला आहे. मागील वीस दिवसांत एका बिबट्याला ठार करून जवळपास १२ बिबट जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले आहे. मात्र, या भागातील बिबट्यांची व हल्ल्यांची संख्या पाहता नागरिकांमध्ये भीतीचे सावट कायम असल्याचे दिसून येते.या घटनांचे गांभीर्य लक्षात घेता राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वनमंत्री गणेश नाईक, माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, म्हाडाचे अध्यक्ष शिवाजीराव आढळराव पाटील, खासदार अमोल कोल्हे, माजी आमदार पोपटराव गावडे, बाळासाहेब बेंडे, देवदत्त निकम, सुरेश भोर, अशा बुचके यांचेसह अनेक नेतेमंडळीनी घटनास्थळांना भेटी देत विविध उपाययोजना बाबत वनप्रशासनाला सूचना दिल्या. वनविभाग आता कारवाई करण्यासाठी सरसावला आहे.



## बिरसा मुंडा यांची जयंती साजरी

आजची मुलं म्हणजे उद्याचा भारत म्हणणारे पंडित जवारलाल नेहरू यांची जयंती तसेच आदिवासींच्या जीवनाला दिशा देणारे जननायक बिरसा मुंडा यांची जयंती आज नागुभाऊ बारणे प्राथमिक शाळा,मुले संतोषनगर थेरगाव येथे विविध कला गुण दर्शनाने साजरी करण्यात आली. जयंतीसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका मा. बनकर मॅडम, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे गणेश मोकाशी, संपादक सांगावा विनय सोनवणे , सागर सूर्यवंशी उपस्थित होते. महापुरुषांचे विचार प्रकट करून सर्व शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी भाषणे केली. या कार्यक्रमासाठी शाळेचे शिक्षिका भाडळे मॅडम, जगनाडे मॅडम यादव मॅडम, लष्करे मॅडम,कोकणे सर,घोडके सर नरवाडे सर,साळवी मॅडम तसेच राजे मॅडम यांनी मार्गदर्शन केले. या निमित्ताने विद्यार्थ्यांना केळी व चिक्की या खाऊचे वाटप केले.

## शेवाळेवाडी परिसरात बिबट्याचा वावर, वन विभागाकडून परिसराची पाहणी

पुणे । प्रतिनिधी

फुरसुंगी, कवडी पाट, शेवाळेवाडी, मांजरी आणि द्राक्ष बागायत केंद्र आदी भागात गेल्या आठवडाभरापासून बिबट्याचा वावर असल्याचे नागरिकांच्या लक्षात आले आहे. काही नागरिकांनी त्याला प्रत्यक्ष पाहिले असून वन विभागाही कळवण्यात आले आहे.

या परिसरात बिबट्याच्या हालचालींची नोंद झाली आहे. ज्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. गेल्या आठवड्यापासून बिबट्या फुरसुंगी, मांजरी, शेवाळेवाडी आणि वडकी यांसारख्या परिसरात दिवसाढवळ्या दिसू लागला आहे.एक सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झाले आहे, ज्यात फुरसुंगी पोलीस स्टेशनच्या मागील भागात बिबट्या दिसून आला. त्याचबरोबर फुरसुंगी परिसरातील एका शेड मध्ये ही बिबट्या काही वेळ थांबल्याचे आढळून आले आहे. वनविभागाकडून परिसरात पाहणी करण्यात आली असून काही ठिकाणी कॅमेरे लावण्यात आले आहेत. नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून एका शेळीवर हल्ला केल्याचे सांगण्यात येत आहे.

## बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या रोहनच्या नावाने वाचनालय, माजी आमदार अशोक पवारांकडून ५० हजारांची मदत

जांबुत । प्रतिनिधी

पिंपरखेड (शिरूर ) येथे इयत्ता सातवीत शिकत असलेला तेरा वर्षीय रोहन विलास बोंबे याचा बिबट्याच्या हल्ल्यात झालेल्या दुर्दैवी मृत्यूमुळे परिसरात मोठा उद्रेक झाला होता. या घटनेने संतप्त ग्रामस्थांनी केलेल्या तीव्र आंदोलनामुळे अखेर शासन स्तरावरून बिबट्या संदर्भात ठोस उपाययोजना करण्याचे महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

या पार्श्वभूमीवर, रोहनची आठवण कायम राहावी यासाठी, माजी आमदार अशोक पवार यांनी पिंपरखेड जिल्हा परिषद शाळेत त्याच्या नावाने वाचनालय सुरू करण्यात यावे, अशी सुचना करत वाचनालयासाठी ५० हजार रुपयांची तात्काळ मदत जाहीर केली.

माजी आमदार अशोक पवार यांनी रोहनच्या शोकसभेला हजेरी लावून जिल्हा परिषद शाळेला भेट दिली आणि दुःख व्यक्त केले. रोहन हा खरोखरच गुणी आणि हुशार विद्यार्थी होता. त्याच्या अकाली मृत्यूमुळे शासनाला बिबट्याच्या प्रश्नावर ठोस निर्णय



घेण्याची वेळ आली.रोहनची आठवण म्हणून आणि इतर विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी म्हणून त्याच्या नावाने शाळेत वाचनालय सुरू करण्यात यावे. मी यासाठी ५० हजार रुपये मदत देतो आणि अजून काही मदत लागल्यास ती देखील करू, असे त्यांनी यावेळी सांगितले.रोहनच्या मृत्यूने बिबट्या प्रश्नाला मिळालेल्या गांभीर्यामुळे प्रशासनाला मोठी पाऊले उचलण्यास भाग पाडले आहे. रोहनच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी शाळेच्या आवारात माजी आमदार अशोक पवार, ग्रामस्थ व शालेय विद्यार्थी यांच्या हस्ते एक आंब्याचे झाड लावण्यात आले. रोहन नेहमीच शाळेच्या उपक्रमांमध्ये हिरिरीने भाग घेत असे.त्याची ही आठवण या झाडाच्या रूपात शाळेत कायम राहील, असे उपस्थित शिक्षकांनी आणि ग्रामस्थांनी सांगितले. यावेळी राजेंद्र गावडे, अरूणा घोडे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शरद बोंबे, रोहन चे वडील विलास बोंबे, बाळासाहेब डांगे, अशोक दाते, माऊली ढोमे, बाळशिराम ढोमे तसेच शालेय विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## पुणे शहराचा पारा १२.७ अंशावर, यंदाच्या हंगामातील सर्वात कमी तापमानाची नोंद

पुणे : शहराचा पारा शुक्रवारी १२.७ अंशावर खाली आला. त्यामुळे यंदाच्या हंगामातील सर्वात कमी तापमानाची नोंद झाली आहे. मात्र मागच्या वर्षीच्या तुलनेत शहरात यंदा १५ दिवस उशीरा थंडीचे आगमन झाले आहे.

दरवर्षी ऑक्टोबर मध्ये शहरात थंडीचा शिरकाव होतो. दिवाळीच्या सुमारास शहरात थंडी जाणवू लागते. मात्र यंदा तसे झाले नाही. दिवाळीपर्यंत पाऊस सुरु असल्यामुळे बाष्पयुक्त वाऱ्यांचा मुक्काम वाढला त्यामुळे शहरात थंडी जाणवली नाही. मात्र नोव्हेंबरच्या पहिल्याच आठवड्यात तापमान अचानक कमी होत जावून शुक्रवारी १४ नोव्हेंबर रोजी शहराचा पारा १३.८ अंशावरुन १२.७ अंशावर खाली आला. शहरात सायंकाळी बोचरे वारे वाहत असल्यामुळे गत पाच दिवस थंडीचा कडाका जास्त जाणवत होता. मात्र शुक्रवार पासून वाऱ्यांचा वेग मंद झाला त्यामुळे तापमानात घट होवून देखील सायंकाळी तापमान १२.८ अंशावर आल्याचे जाणवते. शहरात हिवाळ्यात खडकवासला भागातील एनडीए परसिराचे किमान तापमान सर्वात कमी असते मात्र थंडी सुटल्यापासून हे तापमान निरंक येत आहे. या बद्दल हवामान विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले की, येथील स्वयंचलीत तापमान केंद्रात तांत्रिक बिघाड झाला आहे. त्यामुळे येथील तापमान काही दिवसांपासून नोंदले जात नाही. लवकरच ते दुरुस्त होईल.

# इंद्रायणीकाठी वैष्णवांचा मेळा; संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी सोहळा

**आळंदी । प्रतिनिधी**

टाळ-मृदंगाचा टिपेला पोहोचलेला भक्तिकल्लोळ..., 'माउली-माउली'चा अखंड जयघोष... वैष्णवांच्या मेळ्याने बहरून आलेला इंद्रायणीचा काठ... माउलींच्या दर्शनासाठी लागलेल्या लांबच लांब रांगा... अशा वातावरणाने शुक्रवारी (दि. १४) अलंकापुरी दुमदुमून गेली. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी सोहळ्यात शनिवारी (दि. १५) एकादशी असल्याने पूर्वसंध्येला मराठवाडा, विदर्भ, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र, कोकणातून आळंदीमध्ये दिंड्या दाखल झाल्या आहेत.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या संजीवन समाधी सोहळा अर्थात कार्तिक उत्पत्ति एकादशीच्या भक्ती पर्वणीचा योग साधण्यासाठी शुक्रवारी शेकडो दिंड्यांतून हजारो वारकरी आळंदीत दाखल झाले.



इंद्रायणी घाटावर अनेकांनी फुगडीचा फेर धरला, तर काहींनी टाळ-मृदंगाच्या गजरात देहभान विसरून नाचण्याचा आनंद लुटला.

पहाटेपासूनच वारकऱ्यांच्या राहुट्या व धर्मशाळांमधून अभंगाच्या सुरावटी निघू लागल्या आहेत. टाळ- मृदंगाचा गजराने आसमंत भरून गेला होता. स्नानासाठी इंद्रायणीच्या तीरावर वारकऱ्यांची मोठी गर्दी झाली होती. कार्तिक वारीसाठी इंद्रायणीला पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे पाण्याप्रमाणे भाविकांची भक्तीही जणू दुथडी भरून वाहत होती.

दुसरीकडे माउलींच्या मंदिरामध्ये पहाटेपासून विविध धार्मिक विधींना सुरुवात झाली होती. स्नानानंतर माउलींच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी दर्शनबारी पूर्णपणे भरून गेली होती. यंदाच्या सोहळ्यासाठी हजारो वारकरी आळंदीत दाखल झाले आहेत. त्यांच्यासाठी आळंदी नगरपालिका व जिल्हा प्रशासनाकडून विविध सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

कार्तिक एकादशीनिमित्ताने होणारे कार्यक्रम पहाटे - १ वाजता - माऊलींच्या समाधीवर ११ ब्रम्हवृंदांच्या वेदघोषात पवमान अभिषेक व दुधारती, दुपारी - १२ ते १२.३० वाजता - महानैवद्य, १ वाजता - श्रींची नगरप्रदक्षिणा, रात्री ८.३० वाजता - धुपारती, रात्री १२ ते २ वाजेपर्यंत श्री. मोझे यांच्या तर्फे जागर. उद्या रविवारी (दि. १६) रोजी कार्तिक वद्य द्वादशी असून या दिवशी माऊलींचा रथोत्सव परंपरेनुसार पार पडणार आहे.

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी पिंपरी-चिंचवड निवडणूक प्रचार प्रमुख पदी विठ्ठल उर्फ नाना काटे

**पिंपरी । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या पक्षाच्या आगामी होऊ घातलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका २०२५-२०२६ निवडणूकीकरिता प्रचार प्रमुख पदी माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल ऊर्फ नाना काटे यांची आज (दि. १४) नियुक्ती करण्यात आली. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या सुचनेनुसार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी निवडीचे पत्र दिले.



पिंपरी चिंचवड हा राष्ट्रवादी कॉंग्रेसचा बालेकिल्ला पुन्हा काबिज करण्याकरिता व तो अधिकाधिक मजबूत रहावा या दृष्टीकोनातून प्रचार प्रमुख पदी श्री.विठ्ठल उर्फ नाना काटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विठ्ठल उर्फ नाना काटे हे राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक, माजी विरोधी पक्षनेते असून पिंपरी, चिंचवड आणि भोसरी विधानसभा आगामी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या अतिशय महत्त्वपूर्ण जबाबदारीसाठी मा. अजितदादा पवार साहेब व मा. सुनील तटकरे साहेब यांनी राष्ट्रवादीकडून जबाबदारीचे स्थान देण्यात येत आहे, अशी माहिती शहराध्यक्ष योगेश बहल यांनी दिली.

## महापालिकेच्या वतीने माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने सहकारमहर्षी, पद्मभूषण माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त सांगवी येथील त्यांच्या पुतळ्यास उप आयुक्त अण्णा बोदडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



सांगवी येथील झालेल्या कार्यक्रमास विशेष अधिकारी किरण गायकवाड,जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,प्रशासन अधिकारी राजू कांबळे,मुख्य आरोग्य निरीक्षक उध्दव ड्रीम,आरोग्य निरीक्षक स्नेहल सोनवणे,संदीप राठोड, सामाजिक कार्यकर्ते रविंद्र भोसले आणि नागरिक उपस्थित होते.

वसंतदादा पाटील यांचे कार्य....

वसंतदादा पाटील हे महाराष्ट्रातील ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, थोर समाजसेवक आणि प्रगल्भ नेते होते. त्यांनी आयुष्यभर शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्य जनतेच्या कल्याणासाठी कार्य केले. स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतल्यानंतर त्यांनी राजकारणात प्रवेश करून कृषी आणि ग्रामीण विकासाच्या माध्यमातून राज्याच्या प्रगतीसाठी योगदान दिले. ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून कार्यरत राहिले असून, त्यांच्या कार्यकाळात सिंचन प्रकल्प, सहकार चळवळ, शिक्षण संस्था आणि औद्योगिक विकासावर त्यांनी विशेष भर दिला.

## कडवस्ती शाळेत 'दाना केअर फाउंडेशन'कडून दोन वर्गखोल्यांचे लोकार्पण

**चिंबळी । प्रतिनिधी**

खेड तालुक्यातील औद्योगिक भागातील कुरुळी केंद्रांतर्गत येणाऱ्या कडवस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी बसण्याची सोय व्हावी या उद्देशाने 'दाना केअर फाउंडेशन'च्या माध्यमातून बांधण्यात आलेल्या दोन वर्गखोल्यांचे नुकतेच उद्घाटन करण्यात आले.हे सामाजिक कार्य व दातृत्व समजून 'दाना केअर फाउंडेशन'च्या सीएसआर फंडातून या वर्गखोल्या बांधण्यात आल्या आहेत.



जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शांताराम सोनवणे, सरपंच शिवगंगा सोनवणे, उपसरपंच तसेच सर्व सदस्य आणि आजी-माजी पदाधिकाऱ्यांच्या हस्ते या वर्गखोल्यांचे लोकार्पण करण्यात आले.यावेळी उपसरपंच वैशाली माळशिकर, बाजार समितीचे माजी सभापती काळूराम कड, दाना केअर फाउंडेशन कंपनीचे रफीक शेख, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय कड, सर्व शिक्षक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तळेगावात मविआ सर्व जागा लढविणार

**तळेगाव दाभाडे । प्रतिनिधी**

तळेगाव दाभाडे नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक कॉंग्रेस आय, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना हे सर्व पक्ष महाविकास आघाडीच्या माध्यमातून तळेगाव दाभाडे नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये सर्व ठिकाणी उमेदवार उभे करणार आहेत.



तसेच नगराध्यक्ष पदासाठी देखील महाविकास आघाडी उमेदवार देणार असल्याचे स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. मविआच्या घटक पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेत ही माहिती दिली.

यावेळी तळेगाव शहर युवक कॉंग्रेस अध्यक्ष विशाल वाळुंज, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे मावळ तालुका अध्यक्ष दत्तात्रय पडवळ, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष निरीक्षक भरत भोते, तळेगाव शहर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष शहराध्यक्ष शंकर भेगडे, मनसेचे समन्वयक सचिन भांडवलकर, शिवसेना समन्वयक सतीश गरुड, तळेगाव शह र राष्ट्रवादी युवक अध्यक्ष प्रदीप शिंदे, किरण मोकाशी आदी उपस्थित होते.

२ डिसेंबरला नगर परिषदेची निवडणूक होत आहे. या सर्व जागावर महाविकास आघाडी तर्फे उमेदवार उभे केले जाणार असून नगराध्यक्ष पदासाठी देखील आघाडीच्या माध्यमातून एक विचाराने उमेदवार दिला जाणार आहे. लवकरच उमेदवारांची यादी जाहीर केली जाणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. निवडणुकीची घोषणा झाली असून अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला सुरुवात देखील झाली आहे. अर्ज भरण्याची शेवटची तारीख १७ नोव्हेंबर आहे. त्यानुसार केवळ पाच दिवस उरले आहेत. अद्याप मविआमधील कोणते घटक पक्ष कोणत्या आणि किती जागा लढविणार याबाबत स्पष्टता केलेली नाही. दुसरीकडे महायुतीतील राष्ट्रवादी कॉंग्रेसने बुधवारी आपली पहिली यादी देखील जाहीर केली आहे.